



# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १८० * नांदेड * बुधवार, दि. ८ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## ८ जुलैपासून पावसात घट होणार

### राज्यातील बहुतांश भागात सरासरीपेक्षा कमी पाऊस, शेतकरी चिंतेत

**मुंबई (प्रतिनिधी)–** ८ जुलैपासून राज्यातील बहुतांश भागांमध्ये पावसाच्या प्रमाणात लक्षणीय घट होण्याचा अंदाज असून, ही परिस्थिती किमान पुढील १० दिवस कायम राहण्याची शक्यता आहे. या दरम्यान राज्यातील विविध भागांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस अपेक्षित आहे. तसेच राज्यातील कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हवामान विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार जुलै महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात पहिल्या पंधरवड्याच्या तुलनेत पावसाचे प्रमाण अत्यल्प राहू शकते.

राज्याच्या काही भागात मुसळधार पाऊस कोसळत आहे. यामुळे नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. काही ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाल्याचे देखील पाहायला मिळत आहे. दरम्यान, जुलै महिन्याच्या सुरुवातीला मुंबईसह कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागात अतिवृष्टी झाली असली तरी राज्यातील विविध भागांमध्ये आतापर्यंत सरासरी पेक्षा कमी पाऊस झाला आहे. विशेषतः खानदेश (धुळे व नंदुरबार), मध्य महाराष्ट्र (अहिल्यानगर व सोलापूर), पश्चिम विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भागांमध्ये पावसाचे प्रमाण कमी आहे.

शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीचे नियोजन करावे. राज्यातील ज्या भागांमध्ये अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही, तेथील शेतकऱ्यांनी जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये, असे आवाहन राज्याच्या कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

१ जून ते ७ जुलैपर्यंत देशात सरासरीच्या फक्त ८९ टक्केच पाऊस पडला आहे. तर राज्यात सरासरीच्या १०१ टक्के पावसाची नोंद झाली आहे. साधारणपणे ७ जुलैपर्यंत राज्यात २७७.७ मिमी पावसाची नोंद होत असते. मात्र, मागील काही दिवसांत राज्यात झालेल्या चांगल्या पावसाने सरासरी ओलांडली आहे. प्रत्यक्षात राज्यात २७९.४ मिमी पावसाची नोंद झाली आहे. विभागवार आकडेवारी पाहायची तर कोकणात सर्वाधिक १ जूनपासून सरासरीच्या ११७ टक्के पावसाची नोंद झाली आहे. मध्य महाराष्ट्रात १ जूनपासून सरासरीच्या १०७ टक्के नोंद झाली आहे. जून महिन्यातील कमी पावसाची कसर जुलैच्या पहिल्याच आठवड्यात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पूर्ण झाली आहे. दरम्यान, विदर्भ आणि मराठवाड्यात भीषण स्थिती ओढवण्याची शक्यता आहे.

#### केरळच्या वायनाडमध्ये बोगदा प्रकल्पात भूस्खलन; तीन मजुरांचा मृत्यू

केरळमधील वायनाड जिल्ह्यातील कल्लाडी भागात बांधकाम सुरू असलेल्या ट्विन-टनल प्रकल्पाच्या ठिकाणी मंगळवारी झालेल्या भीषण भूस्खलनात किमान तीन मजुरांचा मृत्यू झाला असून, ९ जण जखमी झाले आहेत. अनेक मजूर अजूनही ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची भीती अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. घटनेनंतर राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, अग्निशमन व बचाव सेवा, पोलीस आणि जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त पथकांनी युद्धपातळीवर मदत व बचाव मोहीम सुरू केली आहे.

#### महाबळेश्वरमध्ये १०० वर्षांतील विक्रमी पाऊस

राज्यात मराठवाडा वगळता विविध विभागात जोरदार पाऊस सुरू असून मुंबई, उपनगरात पावसामुळे शाळांना सुट्टी देण्यात आली आहे. तर, पश्चिम महाराष्ट्रातही मुसळधार पाऊस पडत असून सातारा जिल्ह्यात गेल्या २४ तासांत विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यावर पावसाने अक्षरशः कहर केला असून महाबळेश्वरमध्ये गेल्या २४ तासांत तब्बल ५१३ मिलिमीटर म्हणजेच २० इंच इतक्या विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे यंदाचा हा पाऊस शतकातील सर्वाधिक पावसांपैकी एक मानला जात आहे.

## आखातात पुन्हा भडका! २४ तासांत ३ तेलवाहू जहाजांवर हल्ले; अमेरिका-इराण युद्धबंदी धोक्यात?

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अमेरिका आणि इराणमधील युद्धबंदीच्या कराराला महिनाही पूर्ण झालेला नसतानाच, आखाती देशांमधील परिस्थिती पुन्हा एकदा अत्यंत स्फोटक बनली आहे. सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या 'हॉर्मुजच्या सामुद्रधुनी' परिसरात गेल्या २४ तासांत तीन तेलवाहू जहाजांवर एकापाठोपाठ एक भीषण हल्ले करण्यात आले आहेत. या ताज्या घडामोडींमुळे जागतिक स्तरावर इंधनाचा पुरवठा आणि सागरी सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

ब्रिटनच्या सागरी सुरक्षा यंत्रणेने दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी तिसऱ्या जहाजाला लक्ष्य करण्यात आले. एका अज्ञात 'ड्रोन'द्वारे या जहाजावर हल्ला झाला. या हल्ल्यात जहाजाचे किरकोळ नुकसान झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी किंवा पर्यावरणाची हानी झालेली नाही. हे जहाज आता आपल्या पुढील प्रवासासाठी रवाना झाले आहे.

यापूर्वी झालेल्या हल्ल्यात ओमानच्या किनारपट्टीजवळून जाणाऱ्या कतारच्या एका जहाजाला आग लागली होती. इराणच्या सागरी हद्दीतून बाहेर पडत असताना या जहाजाच्या डाव्या बाजूला अज्ञातांकडून मारा करण्यात आला होता.

या हल्ल्यांनंतर आखाती देशांमधील राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. कतारच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते माजेद अल-अन्सारी यांनी या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे.

आमच्या 'अल रेकय्यात' या गॅसवाहू जहाजावर झालेला हल्ला म्हणजे आंतरराष्ट्रीय सागरी वाहतूक आणि जागतिक ऊर्जा सुरक्षेवरील थेट हल्ला आहे. हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे सरळ सरळ उल्लंघन आहे, असे अन्सारी यांनी म्हटले आहे. यासोबतच कतारने या हल्ल्यासाठी थेट इराणला कायदेशीररीत्या जबाबदार धरले आहे.

दरम्यान, इराणच्या सरकारी टेलिव्हिजनने, या जहाजाने वारंवार दिलेले इशारे धुडकावून लावल्यामुळे त्यावर कारवाई झाली, असे म्हटले आहे. मात्र, इराणने या हल्ल्याची थेट जबाबदारी स्वीकारलेली नाही.

हे हल्ले अशा वेळी होत आहेत जेव्हा इराणने 'हॉर्मुजच्या सामुद्रधुनी'तून प्रवास करणाऱ्या जहाजांसाठी स्वतःचे नियम लागू केले आहेत. केवळ इराणने मंजूर केलेल्या मार्गावरून जाणारी जहाजेच सुरक्षित राहतील, असा कडक इशारा इराणच्या संयुक्त लष्करी कमांडने गेल्या गुरुवारीच दिला होता. तसेच, या भागात अमेरिकन सैन्याने हस्तक्षेप केल्यास त्याला 'तात्काळ आणि चोख प्रत्युत्तर' दिले जाईल, असेही इराणने म्हटले होते.

गेल्या महिन्यात अमेरिका आणि इराण यांच्यात युद्ध थांबवण्यासाठी १४ कलमी युद्धबंदी करारावर स्वाक्षऱ्या झाल्या होत्या. या करारानंतर या मार्गावरून २०० हून अधिक जहाजे सुखरूप पुढे गेली होती. मात्र, गेल्या २४ तासांतील घडामोडींनंतर ब्रिटनच्या सागरी यंत्रणेने या भागातील सुरक्षेचा धोका अजूनही मोठ्या प्रमाणावर कायम असल्याचा इशारा दिला आहे.

## देहूतून तुकोबांची पालखी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ

**पुणे (प्रतिनिधी)–** ज्ञानोबा-तुकोबांच्या जयघोषात श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीने आषाढी वारीसाठी मंगळवारी दुपारी देहूतून पंढरीकडे प्रस्थान केले. यावेळी संपूर्ण देहूनगरी प्रस्थान सोहळ्यामुळे भक्तिचैतन्यात दंग झाली होती.

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचा यंदा ३४१ वा पालखी सोहळा असून प्रस्थान सोहळ्याची सुरुवात पहाटे पाच वाजल्यापासून सुरू झाली. शिळा मंदिर, तपोनिधी नारायण महाराज समाधी मंदिरात विश्वस्तांच्या वतीने महापूजा झाली. इनामदार वाड्यात तुकोबांच्या पादुकांचे पूजन झाले. त्यानंतर सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत देहूकर महाराजांचे काल्याचे कीर्तन झाले.

दुपारी अडीचच्या सुमारास इनामदार वाड्यातून महाराजांच्या पादुका देऊळवाड्यातील भजनी मंडपात आल्या. त्यानंतर प्रस्थान सोहळ्याच्या कार्यक्रमास प्रारंभ झाला. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार छत्रपती संभाजीराजे, आमदार सुनील शेळके, महेश लांडगे यांच्या हस्ते पादुकांची पूजा करण्यात आली.

## अहमदाबाद साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील ३८ दोषींची फाशी, ११ जणांची जन्मठेप उच्च न्यायालयाकडून कायम

**मुंबई (प्रतिनिधी)–** २००८ मधील अहमदाबाद साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात गुजरात उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय देत विशेष न्यायालयाने २०२२ मध्ये सुनावलेली शिक्षा कायम ठेवली आहे. न्यायालयाने ३८ दोषींना सुनावलेली फाशीची शिक्षा आणि ११ दोषींची जन्मठेप कायम ठेवत दोषींच्या सर्व अपील याचिका फेटाळून लावल्या.

या प्रकरणाची सुनावणी विशेष खंडपीठासमोर झाली. मार्च २०२५ पासून नियमित सुनावणीनंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवला होता. अखेर आज निकाल जाहीर करत विशेष न्यायालयाच्या निर्णयावर



शिक्कामोर्तब करण्यात आले.

न्यायालयाने पीडित कुटुंबियांनाही दिलासा देत बॉम्बस्फोटात मृत्यू झालेल्या प्रत्येक व्यक्तीच्या वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत.

यापूर्वी १८ फेब्रुवारी २०२२ रोजी अहमदाबादच्या विशेष न्यायालयाने या प्रकरणात ३८ दोषींना फाशी आणि ११ जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. भारतीय कायद्यानुसार, कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली फाशीची शिक्षा उच्च न्यायालयाच्या मंजुरीनंतरच अंमलात येऊ शकते. त्यानुसार हे प्रकरण गुजरात उच्च न्यायालयात प्रलंबित होते.

उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे २००८ मधील भीषण साखळी बॉम्बस्फोटात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबियांना तब्बल १८ वर्षांनंतर न्याय मिळाल्याचे मानले जात आहे.

## फिफा वर्ल्ड कप २०२६ : स्पेन उपांत्यपूर्व फेरीत; रोनाल्डोच्या विश्वचषक कारकिर्दीचा शेवट

**आर्लिंग्टन (वृत्तसंस्था)–** मिकेल मेरिनोच्या अखेरच्या क्षणी केलेल्या गोलमुळे स्पेनने पोर्तुगालचा १-० ने पराभव करत 'फिफा विश्वचषक २०२६'च्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. या पराभवासह दिग्गज फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या ऐतिहासिक विश्वचषक कारकिर्दीचा अधिकृतपणे शेवट झाला आहे.

सामन्याच्या निर्धारित वेळेच्या शेवटच्या काही मिनिटांत बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरलेल्या मेरिनोने ९०+१ व्या मिनिटाला निर्णायक गोल नोंदवला. फेरान टोरेसने दिलेल्या चपळ पासचा फायदा घेत त्याने पोर्तुगालचा गोलकीपर डियोगो कोस्टाला चकित करत चेंडू नेटमध्ये धाडला.

मेरिनोचा हा गोल त्याच्या राष्ट्रीय संघासाठीचा ११वा गोल होता, ज्याने स्पेनला स्पर्धेच्या पुढील फेरीत नेले. पोर्तुगालने सामन्याच्या शेवटच्या क्षणांपर्यंत बरोबरी साधण्यासाठी निकराचा प्रयत्न केला, परंतु स्पेनच्या भक्कम बचावफळीसमोर त्यांचे प्रयत्न अपयशी ठरले.

## मध्यप्रदेशातून आणलेल्या दोन गावठी पिस्टल विक्रीचा प्रयत्न; तीन जण ताब्यात

### अवैध शस्त्र विक्रीचा प्रयत्न हाणून पाडला; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात अवैध अग्निशस्त्रांचा वापर रोखण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. गावठी पिस्टल विक्रीसाठी आलेल्या तीन जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून २ गावठी पिस्टल जप्त करण्यात आल्या आहेत.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार नांदेड शहरात मालमत्ता आणि शरीराविरोधातील गुन्हे करणाऱ्यांविरुद्ध कॉम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले. दि. ७ जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या माहितीवरून, दोन तरुण नृसिंह चौक, निळा रोडवर पिस्टल विक्रीच्या उद्देशाने थांबले आहेत. या माहितीच्या आधारे पंचांसह घटनास्थळी छापा टाकण्यात आला. छाप्यात शिवराज रंजीत दळवे (वय ३१ वर्ष, रा. कृष्णानगर, डी-मार्ट जवळ,



नांदेड) आणि सरमुखसिंघ जगतसिंघ रामगडीया (वय ३९ वर्षे, रा. शिकारघाट, ता. मुदखेड) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांची पंचांसमक्ष अंगझडती घेतली असता त्यांच्या कमरेला २ गावठी पिस्टल आढळून आल्या.

कसून चौकशीत त्यांनी सदर पिस्टल बालाजी बबन सांगळे (वय १८ वर्षे, रा. गॅस गोडाऊनच्या मागे, वसरणी, नांदेड) याच्याकडून खरेदी केल्याचे सांगितले. त्यानुसार बालाजी सांगळे याला देखील ताब्यात घेण्यात आले. त्याने ही पिस्टल रतनसिंघ भाटीया, रा. रामन घाट, राज्य मध्यप्रदेश याच्याकडून खरेदी केल्याची माहिती दिली. रतनसिंग भाटीया हा सध्या फरार आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचा पथकाने ताब्यातील आरोपी आणि जप्त मुद्देमाल पुढील कारवाईसाठी भाग्यनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक सूरज गुरव, पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश कोरे आणि त्यांच्या पथकातील हवालदार सुनील गटलेवार, मिलींद नरबाग, अंमलदार श्रीराम दासरे, मनोज राठोड, संघरत्न गायकवाड, महेश बडगु, चालक सुधाकर देवकत्ते, तसेच सायबर सेलचे हवालदार राजू सिटीकर, दिपक ओढणे यांनी केली.

## नांदेडमध्ये ४ तासांचे कोम्बिंग ऑपरेशन; सराईत गुन्हेगारांवर धडक कारवाई, १२ गुन्हे दाखल

### १९ आरोपींना अटक, शस्त्र आणि मपोका कायद्यांतर्गत कारवाई


**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील मालमत्ता आणि शरीराविरुद्धच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी एसपी डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार दि. ६ रोजी रात्री ११ ते ७ जुलैच्या पहाटे ३ वाजेपर्यंत शहरात मोठ्या प्रमाणावर कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले. यामध्ये सराईत गुन्हेगारांवर धडक कारवाई करत १९ आरोपींना अटक करून १२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

या ऑपरेशनमध्ये अपर पोलीस अधीक्षक भोकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बिलोली, देगलूर, नांदेड ग्रामीण, स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी, नांदेड शहरातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी व



अंमलदार तसेच आरसीपी पथकाने सहभाग घेतला होता.

या तपासणीत कलम ५५, ५६, ५७ मधील तडीपार तपासले २४, एमपीडीएमधून सुटलेले तपासले २७, शस्त्र व शरीराविरुद्धच्या गुन्ह्यांतील सराईत तपासले ५४, भा.ह.का. ३/२५, ४/२५ नुसार चार जणांविरुद्ध गुन्हे दाखल, म.पो.का. १२२ नुसार आठ जणांवर गुन्हे दाखल, वॉरंट बजावले१९, समन्स बजावणी ३ आणि इतर १ अशी कारवाई करण्यात आली. शहराच्या भाग्यनगर, विमानतळ, वजिराबाद, शिवाजीनगर, विमानतळ आणि नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात एकूण १२ गुन्हे दाखल करून १९ आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.



## नांदेड-लोकमान्य टिळक टर्मिनस दरम्यान दोन साप्ताहिक गाड्या धावणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने हजूर साहिब नांदेड लोकमान्य टिळक टर्मिनस (मुंबई) दरम्यान दोन साप्ताहिक गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे.

गाडी क्र. १७६६७ हजूर साहिब नांदेड लोकमान्य टिळक टर्मिनस गाडी नांदेड येथून प्रत्येक बुधवारी रात्री २१.१५ वाजता सुटेल आणि पूर्णा (२२.१५), बसमत (२३.१५) हिंगोली (००.२५), वाशिम (०१.१५), अकोला (०३.४०) आणि मनमाड (०८.१२) मार्गे लोकमान्य टिळक टर्मिनस येथे गुरुवारी दुपारी १३.०० वाजता पोहोचेल. या गाडीची नियमित सेवा दि. ८ जुलै २०२६ पासून सुरु होईल.

गाडी क्र. १७६६८ लोकमान्य टिळक टर्मिनस हजूर साहिब नांदेड गाडी प्रत्येक गुरुवारी सायंकाळी १६.५५ वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथून सुटेल आणि मनमाड (२२.१०), अकोला (०३.०५), वाशिम (०४.१५), हिंगोली (०५.२५), बसमत (०६.२५), पूर्णा (०७.४५) मार्गे नांदेड येथे शुक्रवारी सकाळी ०९.१० वाजता पोहोचेल. या गाडीची नियमित सेवा दिनांक ०९ जुलै २०२६ पासून सुरु होईल.

गाडी क्र. १७६६५ हजूर साहिब नांदेड लोकमान्य टिळक टर्मिनस गाडी प्रत्येक सोमवारी रात्री २१.१५ वाजता नांदेड येथून सुटून पूर्णा (२२.१५), बसमत (२३.१५ ) हिंगोली (००.२५), वाशिम (०१.१५), अकोला (०३.५०) आणि मनमाड (०८.५०) मार्गे मंगळवारी दुपारी १३.४० वाजता



लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल. या गाडीची नियमित सेवा दिनांक १३ जुलै २०२६ पासून सुरू होणार आहे.

गाडी क्र. १७६६६ लोकमान्य टिळक टर्मिनस हजूर साहिब नांदेड गाडी प्रत्येक मंगळवारी सायंकाळी १६.३५ वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस येथून सुटून मनमाड (२२.००), अकोला (०३.०५), वाशिम (०४.१५), हिंगोली (०५.२५), बसमत (०६.२५), पूर्णा (०७.४५) मार्गे बुधवारी सकाळी ९.१० वाजता नांदेड येथे पोहोचेल. या गाडीची नियमित सेवा दिनांक १४ जुलै २०२६ पासून सुरू होणार आहे.

या विशेष गाड्यांना पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशीम, अकोला, मलकापूर, भुसावळ, चाळीसगाव, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी आणि कल्याण या स्थानकांवर दोन्ही दिशांनी थांबा देण्यात आला आहे.

#### मुंबई-विभागात दरड कोसळल्यामुळे काही रेल्वे गाड्यांच्या सेवेत तात्पुरते बदल

मुंबई विभागात ठाकूरवाडी-मंकीहिल स्थानकांदरम्यान दरम्यान दरड कोसळल्यामुळे रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला असून प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काही रेल्वे गाड्यांच्या सेवेत तात्पुरते बदल करण्यात आले आहेत.

दि. ७ जुलै २०२६ रोजी सुटणारी गाडी क्रमांक १७६१४ हजूर साहिब नांदेडपनवेल एक्सप्रेस ही दौंड स्थानकापर्यंतच धावेल. दि. ८ जुलै २०२६ रोजी सुटणारी गाडी क्रमांक १७६१३ पनवेलहजूर साहिब नांदेड एक्सप्रेस ही पनवेलऐवजी दौंड येथून सुटेल. रेल्वे प्रशासन परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून असून रेल्वे वाहतूक पूर्ववत करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. प्रवाशांनी प्रवासापूर्वी आपल्या गाडीची अद्ययावत माहिती रेल्वे चौकशी सेवा १३९, एनटीईएस, आयआरसीटीसी किंवा जवळच्या रेल्वे स्थानकातून मिळवूनच प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन दक्षिण मध्य रेल्वेने केले आहे.

प्रवाशांनी या विशेष रेल्वे सेवांचा लाभ घ्यावा. या गाड्यांसाठीचे आरक्षण पीआरएस आरक्षण केंद्रे तसेच आयआरसीटीसीच्या ऑनलाइन संकेतस्थळावर उपलब्ध असून, रेल्वेच्या प्रचलित नियमांनुसार बुकिंग करता येईल.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# भारत-इराण संबंधांना नवी दिशा

पश्चिम आशियातील बदलत्या राजकीय घडा-मोडींनी पुन्हा एकदा जगाचे लक्ष त्या प्रदेशाकडे वेधले आहे. इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी यांच्या निधनानंतर आयोजित करण्यात आलेल्या अंत्यसंस्काराकडे केवळ धार्मिक वा राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून पाहता येणार नाही. तो इराणच्या राजकीय संदेशाचा आणि आंतरराष्ट्रीय कुटनीतीचा महत्त्वाचा भाग ठरला आहे. अशा संवेदनशील परिस्थितीत भारताने उच्चस्तरीय शिष्टमंडळ पाठवून दाखविलेली मुत्सद्देगिरी ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संतुलित आणि दूरदर्शी परराष्ट्र धोरणाची साक्ष देणारी आहे. आज भारताचे इस्रायलशी संरक्षण, तंत्रज्ञान, कृषी आणि दहशतवादविरोधी सहकार्य अत्यंत मजबूत आहे. त्याचवेळी सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती आणि इतर आखाती देशांशी व्यापार, ऊर्जा सुरक्षा आणि गुंतवणुकीच्या क्षेत्रात भारताचे संबंध अधिकाधिक दृढ होत आहेत. अशा परिस्थितीत इराणशी असलेले ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिक संबंध टिकवून ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. भारताने या सर्व देशांशी स्वतंत्र आणि संतुलित संबंध राखले आहेत, हीच त्याच्या परराष्ट्र धोरणाची मोठी ताकद आहे. इराण हा भारतासाठी केवळ एक पश्चिम आशियाई देश नाही. ऊर्जा सुरक्षेपासून ते मध्य आशियापर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक असलेल्या चाबहार बंदरापर्यंत अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये इराणची भूमिका निर्णायक आहे. भारत, इराण आणि मध्य आशियातील व्यापार वाढविण्यासाठी तसेच पाकिस्तानला वळसा घालून पर्यायी व्यापारमार्ग उपलब्ध करून देण्यासाठी इराणचे भौगोलिक स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे दोन्ही देशांतील विश्वासाचे नाते अधिक बळकट करणे ही भारताची दीर्घकालीन गरज आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गेल्या काही वर्षांत सर्वांशी मैत्री, कोणाशीही वैर नाही या तत्त्वावर आधारित परराष्ट्र धोरण स्वीकारले आहे. रशिया-युक्रेन युद्ध असो, इस्रायल-हमास संघर्ष असो किंवा इराणशी संबंधित प्रश्न असोत, भारताने कोणत्याही गटाचे अंध समर्थन न करता राष्ट्रीय हिताला प्राधान्य दिले आहे. इराणमध्ये पाठविण्यात आलेले भारतीय शिष्टमंडळही याच धोरणाचा भाग मानावे लागेल. अशा प्रसंगी उपस्थित राहणे हा राजनैतिक शिष्टाचार आहे; त्याचा अर्थ कोणत्याही राजकीय भूमिकेला पाठिंबा असा होत नाही. याच संतुलित भूमिकेमुळे भारताला सर्व संबंधित देशांशी विश्वासाचे संबंध प्रस्थापित करता आले आहेत. अमेरिका, इस्रायल, आखाती देश आणि इराण या सर्वांसोबत भारताचे संवादाचे दरवाजे खुले आहेत. जागतिक पातळीवर वाढत्या ध्रुवीकरणाच्या काळात ही क्षमता फार थोड्या देशांकडे आहे. त्यामुळे भारताला भविष्यात पश्चिम आशियातील शांतता, व्यापार आणि स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी मध्यस्थाची भूमिकाही निभावता येऊ शकते. भारत आणि इराण यांच्यातील संबंध केवळ राजकीय नाहीत, तर हजारो वर्षांच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाशी जोडलेले आहेत. व्यापार, शिक्षण, भाषा आणि संस्कृतीच्या माध्यमातून दोन्ही देशांमध्ये सातत्याने देवाणघेवाण होत आली आहे. आजच्या अस्थिर जागतिक परिस्थितीत या संबंधांना अधिक बळकटी देणे भारताच्या दीर्घकालीन आर्थिक आणि सामरिक हितासाठी आवश्यक आहे. भारताने इराणशी मैत्री कायम ठेवताना इस्रायल आणि अरब राष्ट्रांशी असलेल्या भागीदारीतही कोणताही तडजोडीचा मार्ग स्वीकारलेला नाही. हेच मोदी यांच्या परराष्ट्र धोरणाचे वैशिष्ट्य आहे. संघर्षाऐवजी संवाद, गटबाजीऐवजी संतुलन आणि भावनिक भूमिकेपेक्षा राष्ट्रीय हित यांना त्यांनी प्राधान्य दिले आहे. पश्चिम आशियात कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित होण्यासाठी सर्व देशांनी संघर्षाऐवजी संवादाचा मार्ग स्वीकारणे आवश्यक आहे. अशा काळात भारताची संतुलित भूमिका आणि इराणसह सर्व मित्रदेशांशी संबंध अधिक दृढ करण्याचे प्रयत्न हे केवळ भारतासाठीच नव्हे, तर संपूर्ण प्रदेशाच्या स्थैर्यासाठीही उपयुक्त ठरतील. त्यामुळे इराणशी विश्वासाचे नाते अधिक मजबूत करण्यासाठी आपल्या देशाने अवलंबिलेले परराष्ट्र धोरण हे भारताच्या राष्ट्रीय हिताला पूरक आणि दूरगामी परिणाम करणारे असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

# स्वातंत्र्यवीर सावरकर यांची 'मार्सेलिस' येथील जगप्रसिद्ध उडी!

मे, १९०९ मध्ये सावरकर बॅरिस्टर परीक्षा उत्तीर्ण झाले, परंतु इंग्रज सरकारने त्यांना पदवी देण्यास नकार दिला. याची अनेक कारणे आहेत. लंडनमध्ये मदनलाल धिंग्रा यांनी कर्झन वायली या इंग्रज अधिकाऱ्याला गोळ्या घालून ठार मारले. इग्लंडमध्ये एका भारतीय तरुणाने एका इंग्रज अधिकाऱ्याला मारले हा मोठा पराक्रमच होता. मदनलालच्या या कृतीमागे सावरकरांचाच हात होता. भारतातसुद्धा इंग्रज सरकारच्या विरोधात कटाच्या अनेक घटना घडत होत्या. नाशिकच्या कटात सावरकरांचे अनेक बालमित्र पकडले गेले होते. त्यांचे वडीलबंधू गणेश सावरकर यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. लहानभाऊ नारायण सावरकर यांनाही सरकारने पकडले होते. या सगळ्याच्या मुळाशी विनायक सावरकर आहेत अशा बातम्या इंग्रजांकडे असल्याने त्यांच्या हालचालींवर विशेष लक्ष ठेवण्यात आले. फ्रान्सहून परत येताना इंग्रज सरकारच्या पोलिसांनी सावरकरांना अटक केली. सावरकरांवर हिंदुस्थानात राजद्रोह केल्याचा आरोप ठेवून तेथे खटला चालवण्यासाठी त्यांची रवानगी हिंदुस्थानात केली गेली.

१ जुलै, १९१० या दिवशी सावरकर हिंदुस्थानात परत येण्यासाठी 'मरिया' बोटीत



बसले. त्यांच्यावर रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून दोन इंग्रज पहारेकरी लक्ष ठेवून होते. सावरकरांच्या डोक्यात इथून कसे निसटता येईल हाच विचार चालू होता. मोरिया बोट मार्सेलिस बंदरात यांत्रिक बिघाडामुळे काही काळ थांबली होती. सावरकरांनी बोटीचे निरीक्षण करून 'पोर्ट हल' मधून पसार होण्याचा निश्चय केला होता. अनायासे बोट इथे थांबली आहे, जर आपण इथुन पोहत जाऊन फ्रान्सचा किनारा गाठला तर आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार इंग्रज अधिकारी आपल्याला पकडू शकणार नाहीत. या सगळ्या गोष्टींचा त्यांनी व्यवस्थित अभ्यास केला होता. ८ जुलै, १९१० रोजी शौचकुपात जावून तिथल्या काचेच्या दरवाजावर स्वतःचा अंगरखा ठेवला, त्यामुळे बाहेर उभ्या पहारेकऱ्यांना आतल्या हाल-चाली दिसणार नाहीत. खरचटण्याची, रखड्यांची व चामडी सलवटण्याची पर्वा न करता त्या अथांग सागरात सावरकरांनी उडी मारली. पोहत पोहत ते फ्रान्सच्या किनाऱ्यावर पोहचले देखील, पण इंग्रज शिपायांच्या लालचीला बळी पडून फ्रान्सच्या पोलिसांनी त्यांना इंग्रजांच्या स्वाधीन केले. वरील घटनेचा अभ्यास केला असता काही गोष्टी प्रकर्षाने जाणव-तात. एक म्हणजे समुद्रात उडी घेऊन किनाऱ्यापर्यंत पोहत पोहत पोचायचे हा निर्णय घेणे हे दुबळ्याचे काम नाही, यासाठी प्रचंड शारीरिक शक्ती आणि मनाचा निर्धार लागला असणार. दुसरी गोष्ट कायद्याचा व्यवस्थित अभ्यास आणि त्याचा अचूक वापर करण्याची बुद्धी. काही वेळा असेही वाटते, योगसामर्थ्याने 'लघिमा' 'गरिमा' सारख्या योगसिद्धी तर त्यांना प्राप्त नव्हत्या? कारण, त्या एवढ्याश्या भोकातून सगळा देह बाहेर काढणे खरोखर आश्चर्यजनकच आहे.

सावरकरांची ही उडी पाहून लोककवी मनमोहन म्हणतात,

ही उडी बघताना
मृत्यू कर्तव्य विसरला।
बुरुजावर झेपावलेला
झाशीतील घोडा हसला ।।
वासुदेव बळवंतांच्या
कंठात हर्ष गदगदला ।
क्रांतीच्या केतूवरला
अस्मान कडाडून गेला ।।
विश्वात केवळ आहेत
विख्यात बहाद्दूर दोन ।
जे गेले आईकरिता
सागरास पालांडून ।
हनुमानानंतर आहे
त्या विनायकाचा मान ।।

भारतात आल्यावर मुंबईत विशेष न्यायालय निर्माण करून सावरकरांवर इंग्रज सरकारने खटला चालवला. तसेच नाशिक कटाच्या दुसऱ्या खटल्याचे कामकाजही सुरू होतेच. दोन्ही खटल्यांचा निकाल लागला आणि सावरकरांना दोन जन्मठेपेची म्हणजे ५० वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली. हे ऐकून सुद्धा या वीराच्या प्रसन्नतेत काहीच फरक पडला नाही. उलट एक इंग्रज अधिकारी जेव्हा त्यांच्याशी कुत्सितपणे त्यांच्या या ५० वर्षे शिक्षेबद्दल बोलला तेव्हा सावरकरांनीच त्याला प्रतिप्रश्न विचारला, 'ब्रिटिश सरकार तरी इथे अजून ५० वर्षे टिकणार आहे का?' सावरकरांची ही भविष्यवाणी खरोखरच खरी ठरली, आणि भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले.

**-जगन घाणेकर,**
घाटकोपर, मुंबई
मो. ९६६४५५९७८०

# बालगुन्हेगारी आणि आजची सामाजिक स्थिती



विद्यार्थ्यांना सुधारण्याचा काळ म्हणजे बालपण, त्या बालपणातच विद्यार्थ्यांवर सुसंस्कार फुलत असतात आणि याच बालपणातच मुलांवर कुसंस्कारही होत असतात. बालपणातच मुलांवर सुसंस्कार फुलतात. जर आईवडील शाबूत असतील तर...कधीकधी अपवादात्मक परिस्थितीत एखादा मुलगा सुसंस्कारी निघू शकतो.

लहानपणी एखाद्याची आई किंवा वडील किंवा कधीकधी दोघेही मरण पावल्यानंतर मुलांवर कुसंस्कार होऊ शकतात. कारण त्यांना ही गोष्ट चुकीची, ती गोष्ट चुकीची. ती चूक सुधरव, ही चूक सुधरव, असं म्हणणारं कोणीच नसतं. कधीकधी आई किंवा वडील यापैकी एखादा घटक मरण पावल्यानंतर त्यापैकी जो वाचतो तो आपला दुसरा विवाह करुन मोकळा होतो. वाटतं की, बाळाचा नीट सांभाळ करता येईल. परंतु तो पुनर्विवाह बाळाच्या नीट सांभाळासाठी नसतोच. तो विवाह त्या त्या व्यक्तीचा स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठीच असतो. फक्त नाव असतं की, अमूकअमूक व्यक्तीनं आपला विवाह बाळाचा सांभाळ करण्यासाठी केला. असा विवाह झाल्यानंतर ज्याला सांभाळ करण्यासाठी घरी आणलेलं असतं तो घटक, ज्याने सांभाळ करायला आणलं. त्या घटकाचे क्षणभर का होईना ओझं होताच, त्या सांभाळ करायच्या घटकाला सांभाळून न घेता, त्याचेवर अनन्वित अत्याचार करतो की ज्याचं तपशीलवार वर्णन करताच येत नाही आणि केलंच तर त्याची परिणती ही त्याच्यावरील अत्याचारात वाढ होण्यात होते. अशी मुलं पुढील काळात गुन्हेगारी जगताकडेच वळतात.

चांगल्या सवयी ह्या अगदी लहानपणापासून लावता येतात आणि त्या लावायला हव्यात. नाहीतर वेळ निघून गेल्यावर त्या सवयी लावता येत नाहीत. अलीकडील काळ हा महागाईचा आहे व या काळात मुलांचे आईवडील हे सकाळी आठ वाजल्यापासून कामाला जात असतात. ते सायंकाळीच सातआठला घरी येतात, ते जेव्हा घरी येतात तेव्हा मुलं जरी ताजीतवानी असली तरी त्यांचे मायबाप थकलेले असतात. त्यांना लवकर जेवन करुन दिवसभराचा थकवा घालविण्यासाठी आरामाची गरज असते व ते आराम करतातही. या दरम्यान त्यांनी आपल्या मुलांना, त्यांनी दिवसभर काय काय केलं? हे विचारण्याची गरज असते. परंतु ते एवढे थकलेले असतात की, ते मुलांनी दिवसभर काय काय केलं? हा प्रश्न साधा विचारू शकत नाहीत. ते कधी शाळेत जावून आपल्या मुलांबाबतची विचारणा शिक्षकांना करीत नाहीत. ती शाळेत गेली की, नाही गेली? त्यांनी अभ्यास केला की, नाही केला? अशी साधी विचारणा होत नाही. अशा लोकांची ही मुलं आईवडील त्यांची विचारणा करीत नसल्यानं आईवडिलांना विचारात न घेता दिवसभर शाळेत न जाता उन्हातान्हात कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर फिरत असतात. कशासाठी? तर दोनचार रुपयाचं प्लास्टिक गोळा करण्यासाठी. काही खिळ्याचे तुकडे गोळा करण्यासाठी. त्यांनी गोळा केलेले हे तुकडे वा प्लास्टिक ते लोहा लोखंडवाल्यांना विकतात व त्यातून येणाऱ्या पैशानं ते खाऊ विकत घेऊन खात असतात. मग ही सवय लागते या मुलांना. त्यातूनच त्या सवयी पूर्ण करण्यासाठी हळूहळू चोऱ्याही करु लागतात ही मुलं. याच मुलांना या काळात अडवलं गेलं नाही तर हीच मुलं पुढील काळात कचऱ्याच्या ढिगाऱ्यावरून प्लास्टिक वेचून ते विकून त्यातून जे पैसे मिळवतात. त्या पैशानं खाऊ घेत नाहीत तर चक्क नशेच्या वस्तू घेवून नशा करु लागतात. शिवाय अशा नशा पूर्ण करण्यासाठी हीच मुलं पुढील काळात चोऱ्या व प्रसंगी चाकूहल्लेही करीत असतात. येथूनच सुरु होते गुन्हेगारी. ही मुलं लहान जरी असली तरी त्यांचं कृत्य महान असतं.

ही मुलं का गुन्हेगारीकडे वळतात? असा जर विचार केल्यास त्याचं उत्तर अगदी सोपं आहे. ते उत्तर म्हणजे पालकांचं त्या मुलांवर होत चाललेलं दुर्लक्ष. अलीकडे पालकवर्ग एवढा आपल्या कामात गुरफटला आहे की, त्याला आपल्या मुलांकडे लक्ष द्यायला पुरेसा वेळ नाही. त्यातच बऱ्याचशा पतीपत्नींचं एकमेकांशी पटत नसल्यानं ते एकमेकांपासून विभक्त होण्याकडे जास्त लक्ष देतात. अशावेळेस त्यांचे आपल्या बाळांकडे दुर्लक्ष होते. बरेचसे असे पतीपत्नी आहेत की ते विवाहानंतरही विवाहबाह्य संबंध ठेवतात व प्रसंगी ते संबंध जास्त दृढ होताच पळून जातात. त्यावेळेस ते आपल्या मुलांचाही विचार करीत नाहीत. अशांची मुलं ही बिघडणार नाहीत तर काय? शिवाय महागाईच्या काळात पुरेसे लक्ष ठेवायलाही बऱ्याचशा पालकांजवळ वेळ नसतोच. त्यातच बरेचसे आईवडील आजच्या काळात पुरेसा वेळ जरी मिळत असला तरी ते त्या फावल्या वेळात मोबाईलवर खेळ खेळत वा व्हीडीओ पाहात असतात किंवा एखाद्याशी चॅटींग करीत असतात. अशावेळेसही दुर्लक्ष होतं मुलांवर. मग मुलं आईवडील आपल्याला विचारणा करीत नाहीत असा अंदाज बांधून ते गुन्हेगारीकडे वळू लागतात.

अलिकडील काळात बालगुन्हेगारीचे प्रमाण काढले तर बरेच आहे. बालगुन्हेगारीत महाराष्ट्र राज्य देशात दुसऱ्या स्थानावर आहे. पहिल्या स्थानावर मध्य प्रदेश ( ५६८४ गुन्हे), तर तिसऱ्या स्थानावर राजस्थानचा (२७५७ गुन्हे) क्रमांक लागतो. सध्या महाराष्ट्र राज्यात ४ हजार ५५४ बालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एवढी महाराष्ट्र राज्यात बालगुन्हेगारी आहे. याचाच अर्थ असा की महाराष्ट्र राज्यात पती पत्नीतील फारकतीही बऱ्याच असू शकतील. महाराष्ट्रात घटस्फोटाचे प्रमाण १८.७ टक्के आहे. हे एकूण लोकसंख्येतील आकडेवारी झाली. याचाच अर्थ असा की, प्रत्येक शंभर कुटुंबामध्ये एक घटस्फोट. मग खरंच यातूनच कालचे पतीपत्नी असलेले मुलंमुली आज विभक्त होवून भांडत असताना ते दुसरीकडे दुसराच जोडीदार शोधून त्यांच्यासोबत राहात असतात. हे वास्तविक चित्र प्रत्येकच शंभर कुटुंबातील एका घरात दिसतं. अशी मंडळी मुलांकडे दुर्लक्षच करतात. काही तर असेही महाभाग असतात की, जे आपली स्वतःचीच मुलं सोडून नवीन जोडीदार पकडून पळून गेलेले असतात. त्यानंतर बिचारी अनाथ झालेली मुलं ही भीक मागत मागत जगत असतात.

विशेष सांगायचं झाल्यास जे पतीपत्नी किंवा त्यामधील एक मरण पावतात. अशांची मुले जर बालगुन्हेगार बनत असतील तर गोष्ट वेगळी आहे. त्याला कारणही तसंच असतं. त्यांना स्वतःच्या आईवडिलांसारखी वागणूक न मिळाल्यानं त्यांची अवस्था अशी होते. परंतु ज्यांना आईवडील दोन्ही घटक असतील व ते एकमेकांशी भांडत असतील. फारकत घेत असतील वा मुलांना सोडून विवाहनंतर दुसऱ्याच मुलासोबत पळून जात असतील तर या पळण्याला काय म्हणावे? कशाला त्यांनी मुलं जन्मास घालावी? बालगुन्हेगारीत भर घालण्यासाठी? कशाला करावेत असे विवाह की, त्या विवाहातून त्यांच्याच स्वतःच्या मुलांना सोडून जाण्याची पाळी येते? यात अशाही महिला असतात की ज्या त्यांचा पती दारु पितो म्हणून त्याला सोडतात व दुसऱ्याशी विवाहबद्ध होतात. परंतु त्यांचेवर वेळ अशीही येते की, ज्या व्यक्तीशी त्या विवाह करतात, तो व्यक्ती जास्त दारु पिणारा निघतो. तरीही पटत असतं. ही वास्तविकता आहे. परंतु यातूनच त्यांची मुलं बालगुन्हेगारीकडे वळून त्या बालगुन्हेगारीचं प्रमाण वाढवतात त्याचं काय?

महत्वपूर्ण बाब ही की, पती-पत्नी यापैकी एक जर मरण पावला असेल तर ठीक आहे. परंतु तसं जर झालं नसेल आणि पती पत्नी सलामत असतील तर ते एकमेकांशी कितीही भांडणं केली तरी चालेल. परंतु स्वतःच्या इवल्याशा स्वार्थासाठी त्यांनी एकमेकांपासून विलग होवू नये व मुलांमध्ये कुसंस्काराचे बीजारोपण होवू देवू नये म्हणजे झालं. तसेच बालगुन्हेगारीचेही प्रमाण वाढवू नये. कारण अलीकडील काळात बालगुन्हेगारीचे आकडे हे तुमच्याच पतीपत्नीच्या विनाकारणच्या फारकतीच्या वादानं वाढत असतात यात शंका नाही. या व्यतिरिक्त ज्या आईवडिलांना महागाईची झळ पोहोचली आहे व त्यावर विजय मिळविण्यासाठी दोघंही कामाला जात असतात. त्यांनीही घरी आल्यानंतर पुरेसा मुलांशी संवाद साधावा. जेणेकरुन त्यातील कोणी बालगुन्हेगार बनणार नाही. कधीकधी मधामधात शाळेला भेटी देवून आपल्या मुलांबाबत थोडीशी विचारणाही करावी. ही विचारणा तुमचीच मुलं घडविण्यासाठी फायदेशीर ठरु शकते. तसेच जी पालकमंडळी जास्त मोबाईलमध्ये शिरून असतात त्यांनी कदाचित आपल्या पाल्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी पुरेशी चॅटींग करणं बंद करावं. जेणेकरुन त्यांचं भविष्य बनेल. बालगुन्हेगारीवर विजय मिळेल नव्हे तर तुमच्यामुळं त्या मुलात होणाऱ्या सुसंस्कारातून पुढं देशाचंही भवितव्य बदलवता येवू शकेल. देशाला विकासाच्या क्षेत्रात आघाडीवर नेता येवू शकेल काय जागतिक महासत्ताही बनवता येवू शकेल हे तेवढंच खरं आहे.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार व्हावा!

मुंबईत मान्सूनने जोरदार सलामी दिली आहे. मागील दोन तीन दिवसांपासून मुंबईत चालू असलेल्या पावसाने मुंबईकरांची त्रेधातिरपीट उडवली. मागील ४८ तासांत मुंबईत ३८० मिली पाऊस झाला. या पावसाने १२ मुंबईकरांना हिरावून नेले. गेल्या तीन दिवसात मुंबईत १२ जणांना आपला जीव गमवावा लागला. या पावस-ाने क्षणात होत्याचे नव्हते झाले. दरवर्षीप्रमाणे यावेळीही पावसाने जोरदार हजेरी लावल्याने मुंबई पुन्हा एकदा तुंबली. पाणी तुंबल्यामुळे मुंबईकरांचे अतोनात हाल झाले. जागोजागी गुडघाभर पाणी साचले. रस्त्यांवर देखील पाणी साचले. रस्त्यांवर पाणी आल्याने रस्ते वाहतूक खोळंबली. महामार्गावर पाणी आल्याने शेकडो गाड्या जागेवरच थांबल्या त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. रिक्षा, टॅक्सी यांनी जणू अघोषित संप पुकारला. रेल्वे मार्गावर पाणी साचून रूळ पाण्याखाली रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले.

मुंबई-पुणे रेल्वे मार्गावर रुळ वाहून गेल्याने या मार्गावरील लांबपल्लयाच्या गाड्या रद्द कराव्या लागल्या. काही गाड्यांचा मार्ग बदलावा लागला. पावसामुळे काही लांब पल्लयाच्या गाड्या उशिराने धावू लागल्या. लोकलही धीम्या गतीने सोडाव्या लागल्या. लोकांच्या घरात पाणी साचल्याने लोकांचा संसार पाण्याखाली गेला. पावसामुळे शाळा कॉलेजना सुट्टी द्यावी लागली. एकूणच पावसाने मुंबईची चांगलीच दैना उडवली. या पावसाने २६ जुलै २००५ रोजी झालेल्या प्रलयकारी पावसाची आठवण झाली. पावसामुळे मुंबईची दैना झाल्यावर नेहमीप्रमाणे दोषारोपांची मालिका सुरू झाली. सत्ताधारी व विरोधक एकमेकांवर आरोपांच्या फैऱ्या झाडू लागले. मोठ्या पावसाने मुंबईची दैना का झाली याला जबाबदार कोण? यावर राजकारण सुरू झाले; पण मोठ्या पावसानंतर मुंबईची दैना का होते? पाऊस वाढला की मुंबईची तुंबई का होते? या प्रश्नाकडे मात्र सर्वच पक्ष सोईस्कर डोळेझाक करीत आहेत.

२६ जुलैच्या पावसानंतर शासन, प्रशासन आणि नागरिकांनीही कोणताच धडा घेतला नाही म्हणूनच ही वेळ पुन्हा आली. पूर्वी मुंबईत मोकळ्या जागा असायच्या त्यामुळे तिथे पाण्याचा निचरा व्हायचा. पण आता मुंबईत मोकळ्या जागाच राहिल्या नाहीत. विकासाच्या नावाखाली मुंबई सिमेंटचे जंगल बनले आहे. मुंबईतील रस्तेही सिमेंटचे आणि पेव्हर ब्लॉकचे बनले आहे त्यामुळे पाणी मुरायला मुंबईत जागाच नसते. त्यात मोठा पाऊस आणि भरती एकाच वेळी आली तर ते सर्व पाणी नागरी वस्तीतच शिरते. मुंबई तुंबण्याचे आणखी एक कारण म्हणजे प्लास्टिक !

राज्य सरकारने प्लास्टिकवर बंदी घातली असली तरी मुंबईत दररोज हजारो टण प्लास्टिक कचरा जमा होतो. या प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात प्रशासन अपयशी ठरत आहे. हे प्लास्टिक नदी, नाल्यामध्ये अडकल्याने तेथून पावसाचे पाणी वाहत जाण्यास अडचण निर्माण होते. राज्य सरकारने प्लास्टिकवर घातलेली बंदी किती योग्य आहे हे या पावसामुळे तरी नागरिकांना समजेल. नागरिकांनीही प्लास्टिकचा वापर टाळायला हवा. यासोबतच नागरिकांनी वाटेल तिथे कचरा टाकायची सवयही मोडायला हवी. ग्लोबल वॉर्मिंगमुळे दरवर्षी मुंबईच्या समुद्र पातळीत वाढ होतेय. मुंबई तुंबण्याचे हे ही एक कारण आहे. पावसामुळे केवळ मुंबईचीच नाही तर सर्वच मोठ्या शहरांची अशीच अवस्था होते.



दोन वर्षापूर्वी दिल्लीत झालेल्या मुसळधार पावसामुळे दिल्ली जलमय झाल्याचे आपण पाहिलेच आहे. सहा वर्षापुर्वी राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर शहराचीही पावसामुळे दैना झाली होती. मुसळधार पा-वसामुळे नागपूर शहर पाण्याखाली गेले होते. त्यावेळी विधिमंडळाचे अधिवेशन नागप-ुरात सुरू होते. इतका पाऊस झाला की पावसाचे पाणी थेट विधान भवनात शिरले होते. त्यामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करावे लागले. पावसामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करण्याची नामुष्की सरकारवर आली होती. पावसामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करण्याची इतिहासातील ती पहिलीच वेळ होती.

मागील काही वर्षात पावसामुळे पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली ही शहरे जलमय झाल्याचे आपण पाहिले आहे. राज्यातील सर्वच शहरात कमी अधिक प्रमाणात हीच परिस्थिती आहे. पाऊसही बेभरवशाचा झाला आहे. पूर्वीसारखा पावसाचादेखील अंदाज येत नाही. दोनदोन महिने न येणारा पाऊस दोन तासात येऊन दोन महिन्यांची सरासरी गाठतो. आता हेच पहा ना जून महिन्यात पाठ फिरवणाऱ्या पावसाने ज्युली महिन्याच्या सुरवातीलाच धुमाकूळ घातला आहे.

अवघ्या दोन दिवसात त्याने दोन महिन्याची सरासरी ओलांडली आहे. जुलै महिन्याचा सुरवातीलाच इतका पाऊस यापूर्वी कधीही झाला नव्हता. या सर्व परिस्थितीचा विचार करता मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली यासारख्या मोठ्या शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार होणे गरजेचे आहे. जलव्यवस्थापनाची आजची पद्धत बदलून नवीन पद्धतीचा अवलंब करायला हवा. त्यासाठी उच्च तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. त्यासाठी परदेशातील तज्ज्ञांची मदत घ्यायला हवी. परदेशा-तील जलव्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञांना परदेशात पाठवायला हवे. परदेशातील अधिकाऱ्यांची त्यासाठी मदत घ्यायला हवी.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# जुलैअखेरीस ४० हजारांहून अधिक अपूर्ण घरकुले पूर्ण करा

## मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांचे निर्देश

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा–२ अंतर्गत तिसरा हप्ता वितरित झालेल्या ४० हजार ७५३ अपूर्ण घरकुलांचे काम जुलैअखेरीस पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, त्यासाठी सर्व गटविकास अधिकाऱ्यांनी विशेष मोहीम राबवावी, असे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी दिले.




जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांच्या उपस्थितीत नुकताच तालुकानिहाय आढावा बैठकीत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) तसेच विविध राज्य पुरस्कृत आवास योजनांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रभारी प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, सर्व विभाग प्रमुख तसेच जिल्ह्यातील गट विकास अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत तिसरा हप्ता प्राप्त झालेल्या ४० हजार ७५३ अपूर्ण घरकुलांची ग्रामीण गृहनिर्माण अभियंतानिहाय लाभार्थी यादी तयार करून प्रत्येक घरकुलाचे नियोजनबद्ध पद्धतीने काम पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्रत्येक लाभार्थ्याशी सातत्याने संपर्क ठेवून प्रलंबित कामे वेगाने पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असेही निर्देश देण्यात आले.

याशिवाय, प्रलंबित घरकुलांचे वर्गीकरण, पात्र लाभार्थ्यांना वेळेत निधी वितरण, पूर्ण झालेल्या घरकुलांना सौर ऊर्जेचा लाभ, रमाई, शबरी व मोदी आवास योजनांतील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा, मनरेगाच्या समन्वयातून घरकुलांची कामे पूर्ण करणे तसेच आवास प्लस सर्वे २०२४ आणि पीएम जनमन योजनेतील प्रलंबित बाबी तातडीने निकाली काढण्याच्या सूचनाही बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी दिल्या.

# तब्बल वीस वर्षानंतर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाला मिळाला पूर्णवेळ अधिकारी

## निवृत्त कर्नल राहुल माने यांची नियुक्ती

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)–** परभणी आणि नांदेड येथील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाला तब्बल वीस वर्षानंतर पूर्णवेळ अधिकारी म्हणून रायगड जिल्ह्यात कार्यरत असलेले निवृत्त कर्नल राहुल माने यांची बदली करण्यात आली आहे. ते लवकरच नांदेड आणि परभणी जिल्ह्याचा पदभार स्वीकारणार आहेत. पूर्णवेळ अधिकारी मिळाल्याने या कार्यालयात माजी सैनिकांना व त्यांच्या कुटुंबियांना, पाल्यांना लवकर न्याय मिळणार असल्याचे बोलले जात आहे. सध्या या कार्यालयाचा अतिरिक्त पदभार विद्यमान निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांच्याकडे होता.

सन जून २००६ मध्ये या संयुक्त कार्यालयास शासनाने मान्यता दिली होती. तेव्हापासून ते आजपर्यंत इतर जिल्ह्याचे अधिकारी हे अतिरिक्त कार्यभार करत होते. यामुळे या दोन्ही जिल्ह्यातील सेवानिवृत्त सैनिकांना, त्यांच्या कुटुंबियांना, वीर माता, वीर नारी, वीर पिता या सोबतच शहिदांच्या कुटुंबियांना लवकर न्याय मिळत नव्हता. या कार्यालयात त्यांना खेटे मारावे लागत होते. कार्यालयांतर्गत कुणाचा पायपोस कुणात नव्हता, मात्र तब्बल वीस वर्षानंतर पूर्णवेळ अधिकारी मिळाल्याने त्यांच्या नियुक्तीबद्दलही शासनाचे अभिनंदन करण्यात येत आहे. निश्चितच आता दोन्ही कार्यालयमध्ये येणारे माजी सैनिकांची कल्याणकारी योजनेची कामे होतील व इतर कामे ध्वज निधीचे उद्दिष्ट साध्य होण्यास मदत होईल. या कार्यालयाला पूर्णवेळ अधिकारी मिळावा म्हणून माजी सैनिक सातत्याने प्रयत्न करत होते. माजी सैनिकांच्या कल्याणकारी योजना चांगल्या प्रकारे राबविण्यासाठी अधिकारी सतत उपलब्ध असणे आवश्यक आहे. नांदेडच्या सैनिक कल्याण कार्यालयामध्ये अपुरा कर्मचारी वर्ग आहे. फक्त दोनच कर्मचारी कंत्राटी पद्धतीने मेस्कोद्वारे लावण्यात आलेले आहे. शासकीय कर्मचारी असणे आवश्यक आहे.

नांदेड जिल्ह्यात सशस्त्र सेना ध्वज निधीचे उद्दिष्ट जवळपास दोनशे टक्के निधी जमा होत होता, परंतु मागील दोन वर्षापासून कर्मचारी नसल्यामुळे उद्दिष्ट साध्य होत नव्हते. किनवटसारख्या आदिवासीबहुल जिल्ह्याच्या मुख्यालयापासून जवळपास दीडशे किलोमीटरवरून माजी सैनिक आपल्या कामासाठी नांदेडला येत होते. परंतु अधिकारी नसल्यामुळे त्यांना त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे कामे वेळेवर होत नव्हती.

माजी सैनिक सातत्याने स्वतंत्र अधिकारी द्यावा अशी मागणी करत होते. त्या अनुषंगाने निवृत्त कर्नल राहुल माने यांचे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय रायगड येथून नांदेडला बदली झाली आहे व त्यांना नांदेड व परभणीचा कार्यभार देण्याचे आदेश प्राप्त झाले आहेत. आता संबंधित अधिकाऱ्याने तातडीने या ठिकाणी रुजू होऊन या दोन्ही जिल्ह्याच्या कार्यालयातील कामकाजास गती देत निवृत्त सैनिकांना व त्यांच्या कुटुंबियांना न्याय द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# स्वारातीम विद्यापीठात श्री संत गुलाबराव महाराज जयंती उत्साहात साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्ष येथे सोमवार, दि. ६ जुलै २०२६ रोजी श्री संत गुलाबराव महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यापीठाचे कुलगरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते श्री संत गुलाबराव महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्र–कुलगरू डॉ. अशोक महाजन, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, ज्ञान स्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, उपकुलसचिव डॉ. रवि सरोदे, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, संतोष चव्हाण, गोविंद हंबर्डे, तुकाराम बारसे, दादाराव हंबर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# राज्यातील शिक्षकांना मतदार याद्या सखोल पुनरीक्षणाचे (एसआयआर) काम

- शाळा आणि विद्यार्थी वाऱ्यावर
- 'एसआयआर'च्या कामातून शिक्षकांना वगळण्यात यावे
- मराठवाडा शिक्षक संघाचे निवेदन

**नांदेड ( प्रतिनिधी)–** महाराष्ट्रात मतदार याद्या सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रम सुरू आहे. त्या कामासाठी 'मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून शिक्षकांच्या नियुक्तीचे आदेश देण्यात आले आहेत. शिक्षक त्याकामात व्यस्त असल्याने शाळा आणि विद्यार्थी वाऱ्यावर सोडण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणारा हा निर्णय असल्याने पालक व विद्यार्थी वर्गात प्रचंड असंतोष व चीड निर्माण झाली आहे याची दखल घेऊन एसआयआरच्या कामातून शिक्षकांना वगळण्यात यावे, अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी राज्याचे मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री आणि शालेय शिक्षणमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मराठवाडा शिक्षक संघाने पाठवलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शैक्षणिक वर्षाची नुकतीच सुरुवात झाली आहे. मुले शाळेत येत आहेत. अगोदरच शिक्षक संख्या पुरेशी नसल्याने जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका व खाजगी अनुदानित शाळेसमोर अनंत अडचणी आहेत. अशा परिस्थितीत बहुतांश शिक्षकांना निवडणूक विभागाने 'मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून नियुक्तीचे आदेश दिले आहेत.

कामाचे स्वरूप पहाता हे काम पूर्ण वेळ केले तरी निर्धारित तीन महिन्यांत शिक्षकांची दमछाक होणार आहे. एवढा प्रदीर्घ कालावधीत राज्यातील अध्यापन प्रक्रिया कोलमडून पडणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रचंड शैक्षणिक नुकसान होणार आहे. शाळेत शिकविण्यास प्रथम प्राधान्य देणाऱ्या शिक्षकांवर गुन्हे दाखल करण्यात येत आहेत, ही अतिशय संतापजनक बाब आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाच्या निकालानुसार शिक्षकांना सुट्टीच्या काळात करता येईल एवढेच काम देण्याचे आदेशित करण्यात आले आहे. तद्वतच शिक्षण हक्क कायदा (आरटीई),२००९ नुसार शिक्षकांचे मुख्य कर्तव्य केवळ अध्यापन करणे हेच आहे.

जि. प. व खाजगी अनुदानित शाळेतील बहुतांश शिक्षक एसआयआर कामासाठी नियुक्त करण्यात आले आहेत. अनेक शाळा बंद असल्यासारख्याच आहेत. त्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये प्रचंड असंतोष व चीड निर्माण झाली आहे. याची दखल घेऊन मतदार याद्या सखोल पुनरिक्षण कामातून शिक्षकांना वगळण्यात यावे अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक पी. एस. घाडगे, व्ही. जी. पवार, अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, कोषाध्यक्ष औताडे ए. बी., उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, सहसचिव रेखा सोळुंके, जिल्हाध्यक्ष व्ही. आर. चिलवरवार, सचिव आर. के. वाकोडे, जी. पी. कौशल्य, ई. डी. पाटोदेकर, आनंद मोरे, आर. पी. वाघमारे, डी. बी. नाईक, बालाजी टीमकीकर, अब्दुल हसीब, राम येडते, बाबाराव घाटे यांच्यासह संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# शंकरराव चव्हाण महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रमांना शासनाची मान्यता

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** येथील शंकरराव चव्हाण महाविद्यालयाने श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्या मान्यतेने महाराष्ट्र शासनाकडे पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावास महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून एम. ए. (भूगोल), एम.कॉम. आणि एम. एस्सी. (ऑरगॅनिक केमिस्ट्री) हे नियमित पदव्युत्तर अभ्यासक्रम स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अधिपत्याखाली महाविद्यालयात सुरू करण्यात आले आहेत. यापूर्वी महाविद्यालयात स्वारातीम विद्यापीठाच्या दूरस्थ शिक्षण केंद्रांतर्गत कला शाखेतील मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन या विषयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध होते.

अर्धापूर व परिसरातील विद्यार्थ्यांना पदवीनंतर पदव्युत्तर शिक्षणासाठी बाहेरगावी किंवा मोठ्या शहरात जाण्याची गरज भासणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या पालकांवरील अतिरिक्त आर्थिक भारही कमी होणार आहे. परिसरातील इच्छुक विद्यार्थ्यांनी नियमित पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी (रेग्युलर पी. जी.) प्रवेश निश्चित करून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अजय टेंगसे यांनी केले आहे.

# विनापरवाना देशी दारू विक्री; युवकाविरुद्ध गुन्हा

**नांदेड (प्रतिनिधी)–** मुदखेड शहरातील आमदुरा चौक परिसरात विनापरवाना देशी दारूची विक्री करणाऱ्या एका युवकाविरुद्ध मुदखेड पोलिसांनी कारवाई करून गुन्हा दाखल केला आहे.

मुदखेड तालुक्यातील आमदुरा चौक येथे ४ जुलै रोजी सकाळी रामदास पवार हा कोणताही वैध परवाना नसताना देशी दारूची विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. यावेळी २ हजार रुपयांचा देशी दारूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पोलीस हवालदार हौसाजीराव कदम यांच्या फिर्यादीवरून मुखेड पोलीस ठाण्यात आरोपी युवकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

**शॉक लागून शेतकऱ्याचा मृत्यू**

नायगाव तालुक्यातील कोलंबी शेतशिवारात विद्युत शॉक लागल्याने ५० वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना ४ जुलै रोजी सकाळी घडली. दयानंद हिरामण लांडगे (वय ५०, रा. कोलंबी, ता. नायगाव) हे ४ जुलै रोजी सकाळी शेतात काम करत असताना त्यांना विद्युत शॉक लागला. या दुर्घटनेत त्यांचा जागीच मृत्यू झाला.

# डॉ. प्रभाकर देव यांचा ग्रंथसंग्रह कुरुंदकर संशोधन केन्द्रास प्रदान



**नांदेड (प्रतिनिधी)–** ख्यातनाम इतिहास संशोधक आणि येथील यशवंत महाविद्यालयाच्या इतिहास विभागाचे माजी प्रमुख डॉ. प्रभाकर देव यांनी आपला बहुमोल वैयक्तिक ग्रंथसंग्रह हा नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केंद्राला नुकताच देणगीरुपाने भेट दिला. नरहर कुरुंदकर प्रतिष्ठानच्या अध्यक्षा प्रा. सौ. श्यामल पत्की आणि विश्वस्त दीपनाथ पत्की यांनी हा ग्रंथसंग्रह केंद्राच्या वतीने डॉ. देव यांच्या निवासस्थानी झालेल्या एका छोटेखानी कार्यक्रमात स्वीकारला. या प्रसंगी प्रा. सौ. प्रतिभा देव, डॉ. प्रमोद देव आणि सौ. सविता देव उपस्थित होते.

प्राचीन भारत आणि प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास हे डॉ. देव यांच्या संशोधनाचे क्षेत्र होय. या विषयावर त्यांनी विपुल आणि महत्त्वाचे असे लेखन केले आहे. त्याचबरोबर त्यांनी हैदराबाद मुक्तिसंग्रामाच्या इतिहासाच्या संशोधनात देखील मोलाची भर टाकली आहे. आपल्या अध्यापनाच्या प्रदीर्घ कारकिर्दीत डॉ. देव यांनी आग्नेय आशियाचा इतिहास हा विषय कैक दशके विद्यार्थ्यांना शिकवला. त्यामुळे त्यांच्या या संग्रहात त्यांची स्वतःची ग्रंथसंपदा यासह या तीनही विषयांवरील दुर्मिळ संदर्भग्रंथ आणि संशोधनपर नियतकालिकांचे अंक आहेत. या संग्रहाच्या सूची करण्याचे काम प्रगतीपथावर असून, नजीकच्या भविष्यकाळात ती अभ्यासकांना उपलब्ध करून देण्यात येईल.

डॉ. देव यांच्या या ग्रंथरूपी देणगीमुळे केंद्राचे ग्रंथालय अधिक समृद्ध झाले आहे अशी भावना प्रा. सौ. श्यामल पत्की आणि दीपनाथ पत्की यांच्यासह प्रतिष्ठानचे विश्वस्त तसेच केंद्राचे अध्यक्ष प्रा. दत्ता भगत, आणि प्रतिष्ठानचे इतर विश्वस्त लक्ष्मण संगेवार, डॉ. श्रीनिवास पांडे, डॉ. विश्वाधार देशमुख, डॉ. अभय दातार, आणि केंद्राचे संचालक डॉ. यशवंत जोशी यांनी व्यक्त केली असून याबद्दल डॉ. देव यांचे आभार मानले आहेत.

# आ. बोंढारकरांचा ज्येष्ठ नागरिक संघटनेच्यावतीने सत्कार; मानधनाच्या प्रश्नावर विधिमंडळातील पाठपुराव्याचे कौतुक

**नांदेड (प्रतिनिधी)–** ज्येष्ठ नागरिकांच्या मानधनासह विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र विधानसभेत सातत्याने आवाज उठवणारे नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव बोंढारकर यांचा उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभाग फेस्कॉम, नांदेडच्या वतीने त्यांच्या हिंगोली गेट येथील संपर्क कार्यालयात शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्याप्रती ऋणनिर्देश व्यक्त करून आभार मानले.



फेस्कॉमचे प्रादेशिक अध्यक्ष डॉ. हंसराज वैद्य यांनी सांगितले की, आमदार बोंढारकर यांनी सलग तिसऱ्यांदा विधिमंडळात ज्येष्ठ नागरिकांच्या मानधनाचा तसेच इतर प्रलंबित प्रश्नांचा प्रभावीपणे पाठपुरावा केला. लक्षवेधी सूचनेद्वारे ज्येष्ठांच्या प्रश्नांवर सखोल चर्चा घडवून आणत त्यांनी केवळ मराठवाडाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिकांच्या अपेक्षांना आवाज दिला असून, ही उल्लेखनीय कामगिरी आहे.

यावेळी डॉ. हंसराज वैद्य यांनी सांगितले की, ज्येष्ठ नागरिकांच्या मानधनासह सर्व प्रलंबित मागण्या मार्गी लागल्यानंतर राज्यातील सहकार्य करणाऱ्या लोकप्रतिनिधी व शासनाचा गौरव करण्यासाठी लक्षवेधी महाआनंद मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. याबाबत आ. बोंढारकर यांनीही समाधान व्यक्त करत सकारात्मक प्रतिसाद दिला.

# कुलसचिव डॉ. डी. डी. पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यापीठ परिसरात वृक्षारोपण



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी. डी. पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यापीठ परिसरात वटवृक्षाचे रोप लावून पर्यावरण संवर्धनाचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला. विद्यापीठाच्या गणितीयशास्त्र संकुल परिसरात आयोजित या उपक्रमातून वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

भारतातील राष्ट्रीय वृक्ष असलेल्या वटवृक्षाला पर्यावरणीय, सांस्कृतिक व आयुर्वेदिक दृष्टिकोनातून विशेष महत्त्व आहे. दीर्घायुषी असलेला वटवृक्ष मोठ्या प्रमाणात प्राणवायू निर्माण करून पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मोलाची भूमिका बजावतो. योगायोगाने हा उपक्रम वटपौर्णिमेच्या दिवशी पार पडल्याने या वृक्षारोपणाला सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्वही प्राप्त झाले.

पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देत आरोग्यदायी, औषधी गुणधर्मांनी समृद्ध आणि भावी पिढ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या वटवृक्षाचे रोप लावून समाजात वृक्षसंवर्धनाबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

या प्रसंगी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, डॉ. सूर्यकांत जोगदंड, डॉ. डी. एन. मोरे, डॉ. संतराम मुंडे, भौतिकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजाराम माने, गणितीयशास्त्र संकुलाच्या संचालिका डॉ. रुपाली जैन, नॅक सेलचे समन्वयक डॉ. सुरेंद्र रेड्डी, वित्त व लेखा अधिकारी डॉ. राजेश शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. एम. जी. गायकवाड, उद्यान विभागाचे सहायक कुलसचिव रामदास पेटेवाड, उद्यान अधीक्षक प्रीतम भराडिया यांच्यासह उद्यान विभाग, स्वच्छता विभागातील कर्मचारी तसेच विविध संकुलांचे अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वाढदिवसानिमित्त केवळ औपचारिक शुभेच्छांपुरता कार्यक्रम न ठेवता पर्यावरण संवर्धनाचा विधायक संदेश देणारा हा वृक्षारोपण उपक्रम उपस्थितांकडून विशेष कौतुकास पात्र ठरला.

# जुगार अड्ड्यावर धाड; ७ आरोपी ताब्यात, दोन लाखांचा मुद्देमाल जप्त

## मरखेल पोलिसांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमे अंतर्गत दि. ५ जुलै रोजी मरखेल पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भुतनहिप्परगा (ता. देगलूर) येथे जुगार अड्ड्यावर धाड टाकण्यात आली. यावेळी सात जणांना ताब्यात घेऊन दोन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस पथकाने शासकीय पंचांसमक्ष भुतनहिप्परगा परिसरात शेतातील झाडाखाली सुरू असलेल्या 'तिर्रट' जुगारावर छापा टाकला. यावेळी घटनास्थळावर जुगार खेळणाऱ्या ७ आरोपींना ताब्यात घेण्यात आले. कारवाईदरम्यान आरोपींकडून व घटनास्थळावरून पुढीलप्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला. रोख रक्कम २३ हजार २०० रुपये, ६५ हजार रुपयांचे सहा अँड्रॉइड मोबाईल, एक लाख दहा रुपये किमतीच्या दोन दुचाकी असा १ लाख ९८ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध मरखेल पोलीस ठाण्यात कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास मरखेल पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशावरून सहायक पोलीस निरीक्षक रवी हुंडेकर, पोलीस उपनिरीक्षक विलास पवार, पोलीस अंमलदार संदीप बोदेमवाड, लोखंडे यांनी पार पाडली.

# शहरात ३ ठिकाणी मटका अड्ड्यांवर धाडी; ११ जणांविरुद्ध गुन्हे, २.२८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील भाग्यनगर व इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी सलग कारवाई करत ३ वेगवेगळ्या मटका अड्ड्यांवर धाडी टाकल्या. या कारवाईत एकूण ११ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून, रोख रक्कम, मोबाईल व जुगाराचे साहित्य असा एकूण २ लाख २८ हजार ३२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३ जुलै रोजी रात्री राज कॉर्नर येथील शटरमध्ये सुरू असलेल्या मटका अड्ड्यावर छापा टाकण्यात आला. या कारवाईत नितुल विनोद चव्हाण (रा. निळा रोड) याच्यासह ७ जणांना बेकायदेशीररित्या मिलन डे नावाचा मटका खेळताना पकडण्यात आले. आरोपींकडून रोख रक्कम, २ मोबाईल व ३ स्कुटीसह एकूण २ लाख १३ हजार ८६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास हवालदार पवार करीत आहेत.

दुसऱ्या कारवाईत ४ जुलै रोजी सायंकाळी इतवारा परिसरातील गंजेवार यांच्या घरासमोरील सार्वजनिक रस्त्यावर गोपाळ नंदकुमार गंजेवार (रा. महेबूब नगर) हा नाईट मिलन नावाचा मटका जुगार चालवित असल्याचे आढळून आले. पोलिसांनी त्याच्याकडून ११ हजार २६० रुपये व जुगाराचे साहित्य जप्त केले. या प्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे.

याच दिवशी दुपारी मंडई परिसरात करण्यात आलेल्या आणखी एका कारवाईत शोएब खान हुसेन खान (रा. मंडई, इतवारा) हा मिलन डे क्लोज नावाचा मटका जुगार चालविताना आढळून आला. पोलिसांनी त्याच्याकडून ३ हजार २०० रुपये व जुगाराचे साहित्य जप्त केले. या प्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

सलग करण्यात आलेल्या या कारवायांमुळे शहरातील बेकायदेशीर मटका जुगार व्यवसायावर पोलिसांनी धडक कारवाईचा बडगा उगारल्याचे दिसून येत असून अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

# शहरांमध्ये लठ्ठपणा झपाट्याने वाढतोय !

## तीन नव्या कारणांनी वाढली चिंता, 'स्लीप डेट'ही ठरतेय धोकादायक

**लठ्ठपणा ही केवळ सौंदर्याशी संबंधित समस्या नसून हृदयरोग, मधुमेह, उच्च रक्तदाब आणि पक्षाघातासारख्या गंभीर आजारांचे प्रमुख कारण मानली जाते. पूर्वी शहरांमध्ये राहणाऱ्या लोकांमध्ये लठ्ठपणाचे प्रमाण अधिक होतेच; मात्र आता ही समस्या अधिक वेगाने वाढत असून, त्यामागे तीन नवी कारणे ठळकपणे पुढे आली आहेत. एंडोक्रिनॉलॉजी तज्ज्ञांच्या मते, डेस्क जॉब, फूड डिलिव्हरी ॲप्स आणि 'स्लीप डेट' (झोपेची कमतरता) ही आधुनिक जीवनशैलीतील तीन प्रमुख कारणे लठ्ठपणाला खतपाणी घालत आहेत...**



### डेस्क जॉबमुळे शारीरिक हालचाल कमी

गेल्या काही वर्षांत कार्यालयीन कामाचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. संगणक किंवा लॅपटॉपसमोर तासन्‌तास बसून काम करण्याची सवय वाढल्याने शरीराची हालचाल कमी झाली आहे. त्यामुळे शरीरातील कॅलरी खर्च होण्याचे प्रमाण घटते आणि अतिरिक्त कॅलरी चरबीच्या स्वरूपात साचू लागतात. अनेकांना वाटते की दिवसातील एक तास जिममध्ये व्यायाम केल्याने दिवसभर बसून राहण्याचे दुष्परिणाम भरून निघतात. मात्र संशोधनानुसार, दीर्घकाळ एकाच जागी बसून काम करणे हे स्वतःमध्येच मोठे आरोग्यधोके निर्माण करणारे आहे. त्यामुळे लठ्ठपणाबरोबरच उच्च रक्तदाब, मधुमेह आणि हृदयविकाराचा धोका वाढतो.

### उपाय काय?

- तज्ज्ञांच्या मते, केवळ डाएटिंग किंवा व्यायाम करून हा प्रश्न पूर्णपणे सुटणार नाही. त्यासाठी जीवनशैलीत काही व्यावहारिक बदल आवश्यक आहेत.
- कार्यालयीन कामादरम्यान नियमित अंतराने उठून चालावे.
- दररोज किमान ३० ते ४५ मिनिटे शारीरिक व्यायाम करावा.
- फूड डिलिव्हरी ॲप्सचा वापर मर्यादित व सुज्ञपणे करावा.
- रोज ७ ते ८ तास दर्जेदार झोप घेण्यावर भर द्यावा.
- हे छोटे बदल दीर्घकाळात लठ्ठपणा कमी करण्यास आणि एकूण आरोग्य सुधारण्यास मदत करू शकतात.

### फूड डिलिव्हरी ॲप्समुळे वाढले जंक फूडचे सेवन

पूर्वी बाहेरचे अन्न खाण्यासाठी घराबाहेर जावे लागत होते. आता काही मिनिटांत घरपोच अन्न उपलब्ध होत असल्याने फास्ट फूडचे सेवन मोठ्या प्रमाणात वाढले आहे. विशेषतः व्यस्त जीवनशैली असलेले अनेकजण घरगुती, संतुलित आणि पौष्टिक आहाराऐवजी पिझ्झा, बर्गर, तळलेले पदार्थ, साखरयुक्त पेये आणि प्रक्रिया केलेले (प्रोसेस्ड) अन्न अधिक प्रमाणात मागवतात. या पदार्थांमध्ये कॅलरी, मीठ आणि अस्वास्थ्यकर चरबीचे प्रमाण जास्त असल्याने वजन वाढण्याचा धोका अधिक असतो.

### 'स्लीप डेट' म्हणजे काय?

मोबाईल, सोशल मीडिया, ओटीटी प्लॅटफॉर्म आणि कामाचा वाढता ताण यामुळे अनेक शहरांतील नागरिकांची झोप अपुरी राहते. आठवडाभर कमी झोप घेऊन सप्ताहअखेर जास्त झोपल्याने त्याची भरपाई होत नाही. झोपेच्या कमतरतेमुळे भूक नियंत्रित करणारे घ्रेलिन आणि लेप्टिन हे हार्मोन्स असंतुलित होतात. परिणामी भूक अधिक लागते आणि विशेषतः गोड किंवा जास्त कॅलरीयुक्त पदार्थ खाण्याची इच्छा वाढते. याशिवाय मानसिक थकव्यामुळे शारीरिक हालचालीही कमी होतात.

### तिन्ही कारणांचा एकत्रित परिणाम

आरोग्यतज्ज्ञांच्या मते, दिवसभर डेस्कवर बसून काम करणे, संध्याकाळी फूड डिलिव्हरी ॲपवरून जंक फूड मागवणे आणि रात्री उशिरापर्यंत जागरण करणे या तिन्ही सवयी एकत्र आल्यास वजन झपाट्याने वाढण्यासाठी पोषक वातावरण तयार होते. त्यामुळे शहरांमध्ये लठ्ठपणा आणि त्यासंबंधित आजारांचे प्रमाण वाढत आहे.



## हार्ट ब्लॉकेजची लक्षणे दिसताच व्हा सावध!

बदलत्या जीवन शैलीमुळे हृदयातील रक्ताचा अडथळा ही सर्वात गंभीर समस्यांपैकी एक आहे. ही स्थिती तेव्हा उद्भवते जेव्हा हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या धमन्यांमध्ये चरबी किंवा कोलेस्ट्रॉल जमा होते, आज आम्ही हृदयातील ब्लॉकेज कसे ओळखावे यासंदर्भात सांगणार आहोत. रक्तप्रवाहामध्ये अडथळा असल्यास हृदयविकाराच्या झटक्याचा धोका दोन पट वाढतो. तज्ञ डॉ. विवेक मल्होत्रा यांनी यासंदर्भात एक व्हिडिओ शेअर केली आहे यामध्ये त्यांनी सांगितले आहे की, सुरुवातीच्या लक्षणांकडे लक्ष देऊन आणि घरीच आपल्या आरोग्याची तपासणी करून ही समस्या कमी केली जाऊ शकते. धकाधकीच्या जीवनामध्ये अनेक अशा काही गोष्टी आहेत त्याकडे आपले दुर्लक्ष होत असते. इकोकार्डिओग्राफी, सीटी कोरोनरी अँजिओग्राफी, ईसीजी, टीएमटी किंवा कोरोनरी अँजिओग्राम यांसारख्या चाचण्यांद्वारे हार्ड ब्लॉकेज समस्या तुम्हाला लवकर समजू शकते. तथापि, तज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, तुम्ही घरीसुद्धा त्याचे निदान करू शकता. सहज चालत असताना किंवा पायऱ्या चढताना किंवा कोणतेही कठीण काम करताना छातीत दुखत असल्यास, ही एक समस्या असू शकते, त्यामुळे अशा समस्येकडे दुर्लक्ष करणे हे तुमच्यासाठी धोका असू शकतो. पूर्वीच्या तुलनेत, थोडीशी शारीरिक हालचाल केल्यावरही जर तुम्हाला खूप थकवा जाणवत असेल, तर ते हृदयासाठी चांगले नाही असे तज्ञांनी सांगितले आहे. जास्त प्रयत्न न करता धाप लागणे किंवा झोपल्यावर श्वास घेण्यास त्रास होणे हे देखील हृदयाशी संबंधित समस्येचे लक्षण असू शकते, त्यामुळे याकडे दुर्लक्ष करु नये. हृदयाचे दुखणे नेहमीच छातीपुरते मर्यादित नसते. कधीकधी ते डाव्या हातापर्यंत, खांद्यापर्यंत, मानेपर्यंत, पाठीपर्यंत किंवा जबड्यापर्यंत पसरू शकते या सर्व गोष्टींकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

# हृदयरोग किंवा मधुमेह असल्यास अमरनाथ यात्रा करता येते का?

## जाणून घ्या डॉक्टरांचा महत्त्वाचा सल्ला...

**दरवर्षी लाखो भाविक कठीण अमरनाथ यात्रा करतात. ही यात्रा अत्यंत उंच प्रदेशात होत असल्याने आरोग्याच्या दृष्टीने काही विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. विशेषतः हृदयरोग, मधुमेह, मूत्रपिंडाचे आजार किंवा श्वसनविकार असलेल्या व्यक्तींनी डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यावश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.**

तज्ज्ञांच्या मते, वयोवृद्ध व्यक्ती तसेच आधीपासून गंभीर आजार असलेल्यांनी अमरनाथ यात्रेचा निर्णय घेताना विशेष सावधगिरी बाळगावी. यात्रा सुरू करण्यापूर्वी डॉक्टरांकडून संपूर्ण आरोग्य तपासणी करून आपण उंच प्रदेशातील प्रवासासाठी शारीरिकदृष्ट्या सक्षम आहोत की नाही, याची खात्री करून घ्यावी. जर डॉक्टरांनी प्रवास टाळण्याचा सल्ला दिला असेल, तर तो गांभीर्याने पाळणेच योग्य ठरेल.



### हृदयरोग आणि मधुमेहाच्या रुग्णांनी काय करावे?

ज्यांना हृदयविकार, अँजायना, मधुमेह, मूत्रपिंडाचे विकार किंवा इतर दीर्घकालीन आजार आहेत, त्यांनी यात्रेपूर्वी आपल्या प्रकृतीचे सखोल मूल्यमापन करून घ्यावे. उंच प्रदेशात ऑक्सिजनचे प्रमाण कमी असल्याने अशा रुग्णांवर अतिरिक्त ताण येऊ शकतो.

### कोणत्या तपासण्या कराव्यात?

- रक्त तपासणी
- रक्तातील हिमोग्लोबिनची पातळी
- रक्तातील साखरेची तपासणी
- हृदयाची तपासणी (कार्डियाक चाचण्या)
- मूत्रपिंडाच्या कार्यक्षमतेची तपासणी
- याशिवाय, दमा किंवा श्वसनाचा त्रास असल्यास तो पूर्णपणे नियंत्रणात आहे का, याची खात्री करून घ्यावी. किरकोळ समस्या योग्य औषधोपचारांनी नियंत्रित करता येतात; मात्र गंभीर समस्या असल्यास प्रवासाचा पुनर्विचार करणे अधिक सुरक्षित ठरते.



### त्वरित उपचार घ्या

उंच प्रदेशात मेंदू किंवा फुफ्फुसांवर परिणाम झाल्यास चालताना तोल जाणे, सतत उलटी होणे, दृष्टी धूसर होणे, गोंधळल्यासारखे वाटणे, श्वास घेण्यास तीव्र त्रास होणे अशी लक्षणे दिसताच तातडीने वैद्यकीय पथकाशी संपर्क साधून उपचार घ्यावेत. सुरुवातीची सौम्य लक्षणे दुर्लक्षित केल्यास ती गंभीर स्वरूप धारण करू शकतात.

### यात्रेपूर्वी शारीरिक तंदुरुस्ती वाढवा

अमरनाथ यात्रा ही शारीरिकदृष्ट्या आव्हानात्मक असते. त्यामुळे यात्रेपूर्वी नियमित चालणे, व्यायाम, श्वसनाचे व्यायाम आणि हलका कार्डिओ करण्याची सवय लावावी. जे लोक नियमित व्यायाम करत नाहीत किंवा बहुतांश वेळ आरामदायी जीवनशैली जगतात, त्यांना अचानक अशा कठीण यात्रेला जाणे धोकादायक ठरू शकते. यात्रेपूर्वी शरीरातील ऊर्जा वाढविण्यासाठी संतुलित आणि पौष्टिक आहार घ्यावा. विशेषतः प्रथिनयुक्त आहारामुळे स्नायू बळकट होतात आणि चढाई करताना शरीराला आवश्यक ताकद मिळते.

### आवश्यक औषधे आणि प्रथमोपचार पेटी सोबत ठेवा

प्रवासाला निघताना प्रथमोपचारासाठी आवश्यक साहित्य सोबत असावे. त्यात ताप, सर्दी, खोकला, जुलाब, उलटी किंवा ॲसिडिटीवरील औषधे, जखमांसाठी अँटिसेप्टिक क्रीम, वेदनाशामक औषधे, बँडेज, सनस्क्रीन व डॉक्टरांच्या सल्ल्याने उंच प्रदेशातील त्रास कमी करणारी औषधे. कोणतेही औषध स्वतःहून घेऊ नये. विशेषतः उंच प्रदेशातील ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे होणाऱ्या त्रासासाठीची औषधे डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच घ्यावीत. तसेच, नियमित औषधे सुरू असतील तर ती पुरेशा प्रमाणात सोबत ठेवावीत, जेणेकरून प्रवासादरम्यान औषधांचा तुटवडा भासणार नाही.

### यात्रेदरम्यान कोणती काळजी घ्यावी?

यात्रेदरम्यान शरीरात पाण्याची कमतरता होऊ देऊ नका. स्वच्छ आणि हलका आहार घ्या. अस्वच्छ किंवा पचायला जड पदार्थ टाळा. जर चढाईदरम्यान श्वास घेण्यास त्रास होणे, छातीत जडपणा, छातीत दुखणे किंवा ऑक्सिजनची कमतरता जाणवली, तर तातडीने जवळच्या वैद्यकीय तपासणी केंद्रात जाऊन तपासणी करून घ्यावी. डॉक्टरांनी ऑक्सिजनची पातळी समाधानकारक असल्याचे सांगितल्यासच पुढील प्रवास सुरू ठेवावा. अन्यथा, सुरक्षिततेच्या दृष्टीने यात्रा थांबवून परतणेच योग्य ठरेल.

# लाइट थेरपी म्हणजे काय? वेळेवर लागेल झोप, मनही राहील प्रसन्न; जाणून घ्या कशी करते काम...

**ताणतणाव, चिंता आणि वाढलेला स्क्रीनटाइम यामुळे आजकाल अनेकांना झोपेच्या समस्या जाणवू लागल्या आहेत. शहरांमध्ये तर तरुणांपासून ज्येष्ठांपर्यंत मोठ्या प्रमाणात ही समस्या दिसून येत आहे. अशा परिस्थितीत 'लाइट थेरपी' (Light Therapy) ही आधुनिक उपचारपद्धती झोपेची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि मानसिक आरोग्याला चालना देण्यासाठी उपयुक्त ठरू शकते, असे अनेक संशोधनांतून समोर आले आहे.**

नैराश्य (डिप्रेशन), सततचा थकवा, चिडचिड आणि अपुरी झोप यांचा मानसिक तसेच शारीरिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. अशा समस्यांवर पूरक उपाय म्हणून लाइट थेरपीकडे जगभरात लक्ष वेधले जात आहे. विशेषतः हंगामी नैराश्य (Seasonal Affective Disorder - SAD) आणि शरीराच्या जैविक घड्याळाशी (Circadian Rhythm) संबंधित अडचणी असलेल्या व्यक्तींना या उपचारपद्धतीचा अधिक फायदा होऊ शकतो.

### लाइट थेरपी म्हणजे काय?

लाइट थेरपी ही अशी उपचारपद्धती आहे, ज्यामध्ये व्यक्तीला ठरावीक कालावधीसाठी विशेष प्रकारच्या कृत्रिम तेजस्वी प्रकाशाच्या संपर्कात बसवले जाते. यासाठी 'लाइट थेरपी बॉक्स' या विशेष उपकरणाचा वापर केला जातो. हे उपकरण नैसर्गिक सूर्यप्रकाशासारखा प्रकाश निर्माण करते. या उपचाराचा मुख्य उद्देश शरीराचे जैविक घड्याळ (Biological Clock) किंवा सर्केडियन रिदम संतुलित ठेवणे हा असतो. हीच अंतर्गत प्रणाली आपल्या झोप-जागेपणाचे चक्र, हार्मोन्सचे स्त्रवण आणि शरीरातील ऊर्जा नियंत्रित करते.

### लाइट थेरपी झोप आणि मन :स्थितीवर कशी परिणाम करते?

- मानवी शरीर प्रकाशाबाबत अत्यंत संवेदनशील असते. सकाळचा प्रकाश मेंदूला जागे होण्याचा आणि सक्रिय होण्याचा संदेश देतो. त्यामुळे मेलाटोनिन (Melatonin) आणि सेरोटोनिन (Serotonin) या महत्त्वाच्या हार्मोन्सचे संतुलन राखले जाते.
- मेलाटोनिन झोप नियंत्रित करण्याचे काम करते.
- सेरोटोनिन मन प्रसन्न ठेवण्यास आणि नैराश्य कमी करण्यास मदत करते.
- पुरेसा प्रकाश न मिळाल्यास या हार्मोन्सचे संतुलन बिघडू शकते. परिणामी झोपेची गुणवत्ता कमी होणे, थकवा, चिडचिड आणि मानसिक तणाव वाढण्याची शक्यता असते. लाइट थेरपी शरीराचे जैविक घड्याळ पुन्हा योग्य मार्गावर आणण्यास मदत करते.



### कोणत्या समस्यांत फायदा?

विविध संशोधनांनुसार लाइट थेरपीमुळे अनेक समस्यांमध्ये सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत. यात नैराश्याची लक्षणे कमी होण्यास मदत, निद्रानाश (Insomnia) कमी होण्यास सहाय्य, झोपेची गुणवत्ता सुधारण्यास मदत, झोप लागण्यासाठी लागणारा वेळ कमी होणे, अल्झायमरग्रस्त रुग्णांमधील काही झोपेसंबंधित तक्रारींमध्ये सुधारणा घडून येतात.

### लाइट थेरपी घेताना कोणती काळजी घ्यावी?

- लाइट थेरपीचा योग्य लाभ मिळण्यासाठी काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे.
- केवळ प्रमाणित आणि सुरक्षित लाइट थेरपी उपकरणांचा वापर करावा.
- डोळ्यांचे विकार किंवा मानसिक आजार असल्यास उपचार सुरू करण्यापूर्वी तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.
- बहुतांश तज्ञ सकाळच्या वेळेत लाइट थेरपी करण्याचा सल्ला देतात.
- प्रकाशाकडे थेट पाहण्याची गरज नसते; फक्त त्याच्या दिशेने बसणे पुरेसे असते.
- सुरुवातीला कमी कालावधीपासून सुरुवात करून डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार हळूहळू वेळ वाढवावा.

### उपचारांचा पर्याय नाही

लाइट थेरपी ही वैज्ञानिकदृष्ट्या अभ्यासलेली आणि काही व्यक्तींमध्ये प्रभावी ठरलेली पूरक उपचारपद्धती आहे. विशेषतः जैविक घड्याळ बिघडलेल्या किंवा Seasonal Affective Disorder (SAD) असलेल्या व्यक्तींना तिचा चांगला फायदा होऊ शकतो. मात्र, ती प्रत्येकासाठी सारखीच परिणामकारक असेल असे नाही. तसेच ती वैद्यकीय उपचारांचा पर्याय नसून तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली वापरली जाणारी पूरक उपचारपद्धती म्हणूनच स्वीकारली पाहिजे. योग्य उपकरण, योग्य वेळ आणि वैद्यकीय सल्ला यांचा समन्वय साधल्यास लाइट थेरपी झोपेची गुणवत्ता आणि मानसिक आरोग्य सुधारण्यास उपयुक्त ठरू शकते.

# गौण खनिजाची चोरी रोखण्यासाठी कोकणासह प्रमुख शहरांमध्ये 'ड्रोन' सर्वेक्षण

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची विधानसभेत घोषणा

**मुंबई (प्रतिनिधी) –** राज्यातील अवैध उत्खनन आणि गौण खनिजांची चोरी रोखण्यासाठी राज्य सरकार आता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणार आहे. पुढील सहा महिन्यांत तीन ते चार एजन्सींची नियुक्ती करून मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर), रायगड, पालघर, रत्नागिरी, पुणे, नाशिक, नागपूर, संभाजीनगर आणि अमरावती या संवेदनशील भागांमध्ये सर्वप्रथम ड्रोनद्वारे आणि ईटीएस (इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन) सर्वेक्षण करण्यात येईल, अशी घोषणा महसूलमंत्र्यांनी मंगळवारी विधानसभेत केली. केंद्र सरकारच्या 'रेलटेल' कंपनीमार्फत संपूर्ण गौण खनिजांच्या देखरेखीसाठी कोकण विभागात एक हायटेक 'वॉररूम' देखील तयार करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार सुनील प्रभू यांनी विधानसभेत विरार येथील अवैध उत्खनन आणि त्यातून झालेल्या हत्येच्या प्रकरणावर लक्षवेधी सूचना मांडली होती. या चर्चेला उत्तर देताना महसूलमंत्र्यांनी अवैध उत्खनन करणाऱ्यांवर जरब बसवण्यासाठी सरकार कायद्यात मोठे बदल करणार असल्याचे स्पष्ट केले. विरार येथील अवैध उत्खननाच्या तक्रारीवरून झालेल्या वादात भालचंद्र पाटील व इतर आरोपींनी मिळून खून केल्याची घटना घडली होती. या प्रकरणी माहिती देताना मंत्री म्हणाले की, एकूण ९ आरोपींपैकी ८ आरोपींना अटक करण्यात आली असून १ जण फरार आहे. या गुन्ह्यात भारतीय न्याय संहितेसोबतच संघटित गुन्हेगारी (मोक्का) आणि मृत्युदंडाची शिक्षा होऊ शकेल अशी गंभीर कलमे लावण्यात आली आहेत. तसेच या परिसरातील ११ क्रशर तातडीने बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याच प्रकरणाशी संबंधित १० कोटी रुपयांचा दंड का थांबवण्यात आला, याची गंभीर दखल घेत महसूलमंत्र्यांनी तत्कालीन तहसीलदार अमोल कोल्हे आणि एडी अमित सानप यांची चौकशी करुन बुधवारी सभागृहात निवेदन केले जाईल असे स्पष्ट केले.

चर्चेदरम्यान आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी महत्त्वपूर्ण मुद्दे उपस्थित केले होते. त्यावर सकारात्मक निर्णय घेत मंत्र्यांनी जाहीर केले की, अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली आमदारांचा समावेश असलेली एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली जाईल. ही समिती तीन महिन्यांत अहवाल सादर करेल. तहसीलदारांनी दंड ठोकल्यानंतर अपील करण्यासाठी सध्या २५ टक्के रक्कम भरावी लागते. मुनगंटीवार यांच्या सूचनेनुसार ही अट ५० टक्के करण्याचा विचार ही समिती करेल. अवैध वाहतूक करणारी जप्त केलेली वाहने ७ दिवसांच्या आत शासनजमा करण्यासाठी वनविभागाच्या धर्तीवर नवीन नियमावली डिसेंबरच्या अधिवेशनात आणली जाईल, असेही महसूलमंत्र्यांनी स्पष्ट केले.

### आरटीओतील कथित गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी; दोषींवर कठोर कारवाई केली जाईल -मुख्यमंत्री

**मुंबई(प्रतिनिधी) –** राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) विभागातील कथित गैरव्यवहार, कर चुकवेगिरी आणि अनियमिततांच्या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

सदस्य विजय वडेट्टीवार यांनी या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. त्यास उत्तर देताना ते बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, यासंदर्भात परिवहन मंत्र्यांशी चर्चा केली असून, सभागृहातील सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांची गंभीर दखल घेण्यात आली आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या विषयावरील चर्चेला उत्तर देताना यासंदर्भातील सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, महागड्या लक्झरी वाहनांच्या नोंदणीसंदर्भात काही प्रकरणांमध्ये कर चुकवेगिरी होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

## मुंबईच्या लोकभवनात एसआरपीएफ जवानाची सर्व्हिस रायफलमधून गोळी झाडून आत्महत्या



**मुंबई (प्रतिनिधी) –** मलबार हिल येथील लोकभवन परिसरात सोमवारी सकाळी धक्कादायक घटना घडली. राजभवनाच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या राज्य राखीव पोलीस दलाच्या एका जवानाने ड्युटीदरम्यान स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे राजभवन परिसरात एकच खळबळ उडाली.

मृत जवानाचे नाव कौस्तुभ सांगळे असून ते एसआरपीएफ ग्रुप १६, कोल्हापूर येथील पोलीस अंमलदार होते. सध्या त्यांची नियुक्ती मुंबईतील राजभवनाच्या सुरक्षेसाठी करण्यात आली होती. घटनेच्या वेळी ते राजभवन परिसरातील 'लोक भवन' येथे गार्ड ड्युटीवर होते.

प्राथमिक माहितीनुसार, कौस्तुभ सांगळे यांनी ड्युटीदरम्यान त्यांच्या सर्व्हिस रायफलमधून स्वतःवर गोळी झाडली. गोळीबाराचा आवाज ऐकताच इतर सुरक्षा कर्मचारी घटनास्थळी धावले. मात्र, तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता.

घटनेची माहिती मिळताच मलबार हिल पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि गुन्हे अन्वेषण पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवला आहे.

या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. कौटुंबिक कारण, मानसिक तणाव किंवा इतर कोणते कारण होते का, याचा पोलीस सर्व बाजूंनी तपास करत आहेत. घटनास्थळावरून कोणतीही सुसाईड नोट मि ळालेली नसल्याची प्राथमिक माहिती आहे.

दरम्यान, पोलिसांकडून राजभवनातील सुरक्षा कर्मचारी आणि सहकाऱ्यांचे जबाब नोंदवले जात असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. अधिकृत तपास पूर्ण होईपर्यंत आत्महत्येचे कारण स्पष्ट होऊ शकणार नसल्याचे पोलिसांनी सांगितले.

## सेन्सेक्स, निफ्टीतील तेजीला ब्रेक; गुंतवणूकदारांचे पावणे दोन लाख कोटी बुडाले



**मुंबई (प्रतिनिधी)–**भारतीय शेअर बाजारातील चार दिवसांच्या तेजीला आज ब्रेक लागला आहे. सेन्सेक्स आणि निफ्टी आज घसरणीसह बंद झाले. सेन्सेक्स इंट्रा डे उच्चांकावरुन ६००अंकांनी घसरला. निफ्टी मिडकॅपमध्ये देखील घसरण झाली आहे.

सेन्सेक्स १०४.३५ अंकांनी घसरुन ७८,१८०.७२ वर बंद झाला. तर, निफ्टी ५० निर्देशांक ३१.६५ अंकांच्या घसरणीसह २४,३९८.७० वर बंद झाला. शेअर बाजारात आज मेटल आणि रिअल्टी क्षेत्रातील शेअरमधील घसरणीचा दबाव दिसून आला.

भारतीय शेअर बाजारात गेल्या चार सत्रांमध्ये गुंतवणूकदारांनी चांगली कमाई केली होती. आज मात्र गुंतवणूकदारांचं नुकसान झालं. ६ जुलै २०२६ म्हणजे काल बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य ४८१ लाख कोटी रुपये होतं, त्यात आज १.७७ लाख कोटी रुपयांची घसरण झाली. म्हणजेच गुंतवणूकदारांचं पावणे दोन लाख कोटींचं नुकसान झालं.

सेन्सेक्सवरील ३० शेअर पैकी ११ शेअर तेजीसह बंद झाले. तर १९ शेअरमध्ये घसरण झाली. सर्वाधिक तेजी एचसीएल टेक, टेक महिंद्रा आणि इन्फोसिसच्या शेअरमध्ये दिसून आली. दुसरीकडे सर्वाधिक घसरण ट्रेंट आणि बीईएलच्या शेअरमध्ये दिसून आली.

सेन्सेक्स १०४.३५ अंकांनी घसरुन ७८,१८०.७२ वर बंद झाला. तर, निफ्टी ५० निर्देशांक ३१.६५ अंकांच्या घसरणीसह २४,३९८.७० वर बंद झाला. शेअर बाजारात आज मेटल आणि रिअल्टी क्षेत्रातील शेअरमधील घसरणीचा दबाव दिसून आला.

## वाहनचालक परवान्यासाठी १ ऑगस्टपासून महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

**मुंबई (प्रतिनिधी) –** राज्यात वाहनचालक परवाना मिळविण्यासाठी १ ऑगस्ट २०२६ पासून नवीन नियमावली लागू करण्यात येणार असून त्यानुसार महाराष्ट्र अधिवास (डोमिसाइल) प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सदस्य दिलीप लांडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री सरनाईक बोलत होते. या चर्चेत सदस्य सुनील प्रभू यांच्या सह अन्य सदस्यांनी सहभाग घेतला.

मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, ड्रायव्हिंग परवाना नवीन नियमावलीचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला असून मंजुरीनंतर त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

त्याचबरोबर राज्यात सुरू असलेल्या अनधिकृत बाईक टॅक्सी सेवांवर दंडात्मक कारवाई सुरू आहे. या क्षेत्राचे नियमन करून राज्याला महसूल मिळावा आणि तरुण-तरुणींना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने शासन नियोजन करत आहे.

या नव्या व्यवस्थेनुसार बाईक टॅक्सी चालकांकडून दररोज पाच रुपये महसूल जमा करण्यात येणार आहे. प्रत्येक राईडमागे दोन रुपये कल्याण निधीसाठी जमा करणे बंधनकारक करण्याचा प्रस्ताव आहे; तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे किंवा चुकीच्या पद्धतीने वाहन चालविणाऱ्यांवर परिवहन विभागाकडून कठोर दंडात्मक कारवाई केली जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र बाईक टॅक्सी नियमांमध्ये म हिला, विद्यार्थी आणि अल्पवयीन प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. बाईक टॅक्सी चालकाकडे मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ३ नुसार वैध वाहनचालक परवाना; तसेच महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ४ नुसार सार्वजनिक सेवा वाहन चालविण्याचे अधिकारपत्र (बॅज) असणे बंधनकारक करण्यात आले आहे. हा बॅज देण्यापूर्वी अर्जदाराची पोलीस विभागामार्फत चारित्र्य पडताळणी करण्याचीही तरतूद करण्यात आली आहे.

महाराष्ट्र बाईक टॅक्सी नियम, २०२५ नुसार अर्जदाराने खाजगी दुचाकी वाहनांद्वारे प्रवासी वाहतूक करता कामा नये; तसेच उर्वरित सर्व अटींची पूर्तता एका महिन्याच्या आत करण्याच्या अटीवर राज्य परिवहन प्राधिकरणाने उबेर इंडिया सिस्टीम्स प्रा. लि., रोपेन ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस प्रा. लि. (रॅपिडो) आणि नी टेक्नॉलॉजीज प्रा. लि. (ओला) या ग्रीगेटर कंपन्यांना मुंबई महानगर क्षेत्रासाठी ३० दिवसांचा तात्पुरता परवाना देण्यास मान्यता दिली होती.

अनधिकृत बाईक टॅक्सी सेवा रोखण्यासाठी परिवहन विभागाने आणखी कठोर भूमिका घेतली आहे; तसेच राज्यातील प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या वायुवेग पथकांकडून परवान्याशिवाय बाईक टॅक्सी सेवा चालविणाऱ्या वाहनचालकांवर सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत ८१४ दोषी वाहने आढळून आली. त्यापैकी १५१ वाहने जप्त करण्यात आली असून १४ गुन्हे (एफआयआर) दाखल करण्यात आले. या कारवाईत १६.२५ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तर एप्रिल २०२६ ते मे २०२६ या दोन महिन्यांत २११ दोषी वाहनांवर कारवाई करण्यात आली. त्यापैकी ६६ वाहने जप्त करण्यात आली आणि २.३१ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

राज्यात बाईक टॅक्सी सेवा कायदेशीर चौकटीत आणून प्रवाशांची सुरक्षितता, चालकांचे नियमन, महसूल वाढ आणि युवकांना रोजगार या चारही बाबी साध्य करण्यासाठी शासन सर्वंकष धोरण राबवत असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.


### टी. सी. हरवली

माझी कु. प्रशिका नागेश कांबळे या नावाची १० वी पासची टी. सी. नांदेड ते सिडको दरम्यान ऑटो प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता**–कु. प्रशिका नागेश कांबळे रा. सिडको, नवीन नांदेड मो. ९७६७९३१५६८

### टी. सी. हरवली

माझी अक्षय एकनाथराव कदम या नावाची १२ वी विज्ञान पासची टी. सी. छत्रपती चौक ते चैतन्यनगर दरम्यान ऑटो प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता**–अक्षय कदम, मोहननगर हॉसिंग सोसायटी वाडी बु. नांदेड मो. ७६२०६७२४४९



### टी. सी. हरवली

माझी अक्षय एकनाथराव कदम या नावाची १२ वी विज्ञान पासची टी. सी. छत्रपती चौक ते चैतन्यनगर दरम्यान ऑटो प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता**–अक्षय कदम, मोहननगर हॉसिंग सोसायटी वाडी बु. नांदेड मो. ७६२०६७२४४९


## 'एमपीएससी'च्या सीबीटी व नॉर्मलायझेशन विरोधात काँग्रेसचे आजपासून बेमुदत साखळी उपोषण व ठिय्या आंदोलन

**मुंबई(प्रतिनिधी) -** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने स्पर्धा परीक्षा सीबीटी (कॉम्प्युटर बेस्ड टेस्ट) पद्धतीने घेण्याचा तसेच नॉर्मलायझेशन पद्धत लागू करण्याच्या घेतलेल्या निर्णया विरोधात काँग्रेसच्यावतीने बुधवार, दि. ८ जुलैपासून बेमुदत साखळी उपोषण व ठिय्या आंदोलन करण्यात येणार आहे.

या निर्णयाविरोधात प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने बुधवार, दि. ८ जुलै २०२६ पासून सीबीडी बेलापूर येथील एमपीएससीच्या मुख्यालयासमोर बेमुदत साखळी उपोषण व ठिय्या आंदोलन सुरू करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने सुरुवातीपासूनच विद्यार्थ्यांच्या या न्याय्य लढ्याला भक्कम पाठिंबा दिला आहे. अधिवेशनातही महाविकास आघाडीतील आम दारांनी हा विषय अत्यंत प्रभावीपणे सभागृहात उपस्थित करून विद्यार्थ्यांचा आवाज बुलंद केला. या प्रश्नावर तोडगा निघावा, यासाठी एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भिमनवार यांच्याशी दोन वेळा दूरध्वनीवर संपर्क साधून काँग्रेस पक्षाचे प्रतिनिधी, विद्यार्थी आणि विविध विद्यार्थी संघटनांची संयुक्त बैठक आयोजित करण्याची विनंती करण्यात आली होती. मात्र, आजपर्यंत त्याबाबत कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नसल्याचे सांगण्यात आले.

२८ जून २०२६ रोजी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागातर्फे स्पष्ट इशारा देण्यात आला होता की, पुढील १० दिवसांत सीबीटी पद्धतीने परीक्षा घेण्याचा निर्णय मागे घेतला गेला नाही, तर काँग्रेस पक्ष विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी रस्त्यावर उतरेल. दुर्दैवाने शासनाने व एमपीएससी प्रशासनाने या इशाऱ्याचीही दखल घेतलेली नाही. त्यामुळे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने हे आंदोलन करण्यात येत असल्याचे काँग्रेसच्यावतीने कळविण्यात आले आहे.

या आंदोलनात प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष आबा दळवी, प्रदेश सरचिटणीस तथा रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे अध्यक्ष धनंजय रामकृष्ण शिंदे हे उपोषणात भाग घेणार आहेत, अशी माहिती धनंजय शिंदे यांनी एका प्रसिद्धीपत्रकानुसार दिली आहे.


### जिजाऊ महिला सक्षमीकरण केंद्र नांदेड,

जिजाऊ महिला सक्षमीकरण विकास केंद्र नांदेड (संचलित संवेदना सेवाभावी संस्था नांदेड), जिल्हा कार्यालय मार्फत जिजाऊ महिला सक्षमीकरण कार्यक्रमा अंतर्गत (विना अनुदानित) करार तत्त्वावर ११ महिने कालावधीकरिता खालीलप्रमाणे पद भरावयाचे आहे.

**थेट मुलाखत**

| पद | नियुक्तीचे ठिकाण व वदसंख्या | शिक्षण | वय | कार्यक्षेत्र | एकूण पद | अनुभव | मुलाखत दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| व्यवस्थापक ११ महिने कंत्राटी (मानधन) | जिजाऊ महिला सक्षमीकरण विकास केंद्र नांदेड, वैशाखी नगर नांदेड/परभणी | M.A./ M.S.W./R.D | १८ ते ५५ | नांदेड, परभणी | नांदेड – १ परभणी – १ | ०७ वर्षाचा बचत गटावर काम केल्याचा अनुभव | १०/०७/२०२६ (वेळ स.११.०० ते दुपारी ०२.००) |
| लेखापाल ११ महिने कंत्राटी (मानधन) | जिजाऊ महिला सक्षमीकरण विकास केंद्र नांदेड, वैशाखी नगर नांदेड | B.Com./M. Com | १८ ते ६० | नांदेड | ०१ | १० वर्षाचा काम केल्याचा अनुभव/ रिटायर्ड कर्मचारी/ अर्धवेळ काम करणाऱ्यास प्राधान्य | १०/०७/२०२६ (वेळ स.११.०० ते दुपारी ०२.००) |
| सहयोगिनी ११ महिने कंत्राटी (मानधन) | जिजाऊ महिला सक्षमीकरण विकास केंद्र नांदेड, वैशाखी नगर नांदेड | S.S.C./ H.S.C./B.A. | १८ ते ५५ | नांदेड जिल्हा शहरी/ ग्रामीण | १५ | ०५ वर्षाचा बचत गटावर काम केल्याचा अनुभव | १०/०७/२०२६ (वेळ स.११.०० ते दुपारी ०२.००) |
| सहयोगिनी ११ महिने कंत्राटी (मानधन) | जिजाऊ महिला सक्षमीकरण विकास केंद्र नांदेड, वैशाखी नगर नांदेड | S.S.C./ H.S.C./B.A. | १८ ते ५५ | परभणी जिल्हा शहरी/ ग्रामीण | १५ | ५ वर्षाचा बचत गटावर काम केल्याचा अनुभव | ११/०७/२०२६ (वेळ स.११.०० ते दुपारी ०२.००) |

तरी वरील पात्रता धारक व अनुभवी उमेदवारांनी जिजाऊ महिला सक्षमीकरण विकास केंद्र वैशाखी नगर नांदेड, येथे कार्यालयीन (सकाळी ११ ते २) या वेळेत वर नमूद तारखेस १) मूळ शैक्षणिक कागदपत्र २) एक झेरॉक्स प्रत ३) अनुभव प्रमाणपत्रासह उपस्थित रहावे. पत्ता : वैशाखी नगर, पौर्णिमा नगर जवळ, आनंद नगर नांदेड-४३१६०५ मो. ९६५७३४८६५०

स्वाक्षरीत
सचिव, जिजाऊ महिला सक्षमीकरण विकास केंद्र
(संचलित संवेदना सेवाभावी संस्था, नांदेड)

### टी. सी. हरवली

माझी लक्ष्मीकांत श्रीरंग काशेटवार या नावाची १२ वी विज्ञान पासची टी. सी. बाऱ्हाळी ते मुखेड दरम्यान बस प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता**– श्रीरंग काशेटवार रा. बाऱ्हाळी ता. मुखेड, जि. नांदेड मो. ९८२३६४०२४०

### टी. सी. हरवली

माझी गंगाधर भीमाशंकर जंगम या नावाची ७ वी नापासची टी. सी. नांदेड ते शिराढोण दरम्यान बस प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता**–गंगाधर भीमाशंकर जंगम रा. शिराढोण, ता. कंधार, जि. नांदेड

### टी.सी. हरवली

माझी अजय राम जाधव या नावाची १२ वी कला पासची टी. सी. नांदेड ते लातूर बस प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील मोबाईल वर संपर्क साधावा. संपर्क पत्ता– अजय राम जाधव, दिलीपसिंह कॉलनी, वजिराबाद, नांदेड मो. ८८३०५९१८०५

### Change In Name

My old name is **A. SAMAD SHEKH** Which now I am changing to my new name **SHAIKH ABDUL SAMAD SHAIKH RASHID** henceforth all his official correspondence will be done as per the new name. Please consider this public declaration.
**Address - Ayesha Colony Sailu Parbhani Maharashtra-431503**
**Mo.No. 9158324886**

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार १) शाहीन परवीन काजी नजमोद्दीन, २) शमीम बेगम मिर्जा साजीद बेग, ३) शाहेदा सिमरन कादरी सय्यद मुजीब कादरी, ४) शहेनाज सय्यद मुस्ताक व ५) शबाना बेगम अझहरोद्दीन सिद्दीकी सर्व रा. ह.मु. हनुमान मंदिर परिसर, मोमीनपुरा, किनवट ता. किनवट जि. नांदेड यांनी मौ. किनवट ता. किनवट जि.नांदेड सर्वे नं. १२० गट क्र. २०५/१ क्षेत्र ०१ हे. ९६ आर जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मुलने व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी झालेले हस्तांतरण नियमीत करून भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. किनवट ता. किनवट जि. नांदेड सर्वे नं. १२० गट क्र. २०५/१ क्षेत्र ०१ हे.९६ आर ही जमीन हैद्राबाद ईनाम निर्मुलने व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी झालेले हस्तांतरण नियमीत करून भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**

### कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

### महात्मा गांधी डी.एड कॉलेज, सिडको नवीन नांदेड ता.जि. नांदेड

**महाराष्ट्र शासन व एन.सी.टी.ई भोपाळ मान्यता प्राप्त अभ्यासक्रम**

**डी.एल.एड. प्रथम वर्ष व्यवस्थापन कोटा प्रवेश सूचना २०२६-२७**

डी.एल.एड. प्रथम वर्ष २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी खाजगी विना अनुदानित अध्यापक विद्यालय प्रथम वर्ष डी.एल.एड. (मराठी माध्यम) प्रवेशासाठी एकूण क्षमतेच्या २०% जागेसाठी कोट्यातील खाजगी व्यवस्थापन पात्र उमेदवारांकडून मागविण्यात येत आहेत.

अर्ज विक्री : दि. ०८.०७.२०२६ ते १२.०७.२०२६ वेळ सकाळी ११-०० ते सायं.०५-००.
अर्ज स्वीकृती : दि. ०८.०७.२०२६ ते १२.०७.२०२६ वेळ सकाळी ११-०० ते सायं.०५-००.
ठिकाण : महात्मा गांधी डी.एड. कॉलेज सिडको, नवीन नांदेड ता.जि. नांदेड
प्रवेश अर्ज शुल्क : ओपन रू. २००/- मागासवर्गीयासाठी रु. १००/- (जातीचे प्रमाणपत्र सोबत आणावे)
शैक्षणिक पात्रता : उमेदवार किमावन १२ वी कला, वाणिज्य, विज्ञान, एम.सी.व्ही.सी.; य.च.म.मु.वि. प्रथम वर्ष उत्तीर्ण ओपन ५०% व मागासवर्गीयांसाठी ४५% गुणासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
प्रवेश क्षमता : २०% जागा (व्यवस्थापन कोटा १० जागा) व्यवस्थापन कोट्यातील (२०%) शाखा निहाय व संवर्ग निहाय आरक्षण खालील प्रमाणे.

| शाखा- मराठी माध्यम-जा | विज्ञान (५०%) | कला (४०%) | वाणिज्य (१०%) | एकूण जागा |
|---|---|---|---|---|
| | -०५- | -०४- | - ०१- | -१०- |

:: संवर्ग निहाय आरक्षण ::

| संवर्ग मराठी माध्यम | एस.सी.; एस.टी. (३०%) -०२- | व्ही.जे.एन.टी. अ.ब.क.ड. (११%) -०१- | एस.बी.सी.; ओ.बी.सी. (११%) -०२- | ओपन (५०%) -०५- |
|---|---|---|---|---|

:: संपर्क ::

**प्राचार्य : श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित – महात्मा गांधी डी.एड.कॉलेज, सिडको नवीन नांदेड**
**मो.नं. ९८९०८०१८६७ / ७०२०८४१८५७ / ९४२००५०००**

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१
तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# एसआयआर प्रक्रियेत एकही पात्र मतदार वंचित राहणार नाही -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## माध्यमांनी मोहिमेची व्यापक जनजागृती करावी



**नांदेड (प्रतिनिधी)–** विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) २०२६ अंतर्गत जिल्ह्यात ३० जूनपासून बुथस्तरीय अधिकारी यांच्या माध्यमातून गणना पत्रके भरण्याची प्रक्रिया सुरू असून, ही मोहीम विहित मुदतीत पूर्ण करण्यात येईल. या प्रक्रियेत एकही पात्र मतदार वंचित राहणार नाही, अशी ग्वाही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवार दि. ७ जुलै रोजी दुपारी ४ वाजता आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी राजकुमार माने यांचे उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी कर्डिले यांनी सांगितले की, जिल्ह्यातील सर्व पात्र मतदारांनी विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन घरोघरी पडताळणीसाठी येणाऱ्या बीएलओंना आवश्यक माहिती द्यावी. मोहिमेला वेग आला असून, मतदारांच्या सहकार्यामुळे ती अधिक प्रभावीपणे पूर्ण होईल.

या मोहिमेत जिल्हाधिकारी, मतदान नोंदणी अधिकारी आणि इतर अधिकारी प्रत्यक्ष गृहभेटी देऊन गणना पत्रके भरणे व त्यांचे डिजिटायझेशन करण्याचे काम करत आहेत. यासाठी जिल्ह्यात ३,०८८ बीएलओ, ३१० बीएलओ पर्यवेक्षक, ९० सहायक मतदार नोंदणी अधिकारी आणि ९ मतदार नोंदणी अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. आवश्यकतेनुसार अतिरिक्त बीएलओंचीही नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच मान्यताप्राप्त राष्ट्रीय व राज्य राजकीय पक्षांनी १०,९०९ बुथस्तरीय एजंट नियुक्त केले आहेत.

गणना पत्रकाचे मॅपिंग किंवा डिजिटायझेशन करताना तांत्रिक अडचणी आल्यास मतदारांनी घाबरून न जाता संबंधित बीएलओशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले. २००२ च्या विशेष सखोल पुनरीक्षणातील मतदारांनी केवळ माहितीची पडताळणी करून गणना पत्रक जमा करायचे आहे. पात्र मतदारांना गणनापत्रक भरण्यासाठी voters.eci.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक**

यापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयात राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेण्यात आली. या बैठकीत एसआयआर मोहिमेची प्रभावी जनजागृती करण्यावर भर देण्यात आला. मतदार यादी शुद्ध करण्याच्या प्रक्रियेत पात्र मतदारांचे नाव कायम ठेवले जाईल, तर मृत, दुबार किंवा स्थलांतरित मतदारांची नावे नियमानुसार वगळली जातील, असे जिल्हाधिकारी कर्डिले यांनी स्पष्ट केले.

# कै. सौ. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कारांचे वितरण १२ जुलै रोजी

## माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, ज्येष्ठ विधिज्ञ खा. उज्ज्वल निकम यांची उपस्थिती



**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठवाड्यासह महाराष्ट्रात एक वेगळी उंची निर्माण केलेला कै. सौ. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कार सोहळा दि. १२ जुलै रोजी आयोजित केला असून, या सोहळ्यास माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, ज्येष्ठ विधिज्ञ खा. उज्ज्वल निकम यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

रविवार, दि. १२ जुलै रोजी दुपारी १.३० वाजता स्टेडियम परिसरातील शंकरराव चव्हाण सभागृहात हा भव्य सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण हे राहणार असून, ज्येष्ठ विधिज्ञ तथा राज्यसभा सदस्य खा. उज्ज्वल निकम यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे. या कार्यक्रमासाठी भोकरच्या आ. श्रीजयाताई चव्हाण, उद्योजक सुजयाताई चव्हाण यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. दैनिक सत्यप्रभाच्या वतीने मागील २२ वर्षांपासून कै. सौ. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. या वर्षापासून डॉ. शंकरराव चव्हाण जीवनगौरव पुरस्काराची सुरुवात करण्यात आली आहे.

पहिल्या वर्षी लोकमतचे एडिटर इन चीफ तथा माजी मंत्री राजेंद्र दर्डा यांना या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. तर कै. सौ. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कार राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजयाताई रहाटकर, छत्रपती संभाजीनगर येथील 'स्नेहसावली' या सेवाभावी संस्थेचे संस्थापक डॉ. बालाजी आसेगावकर, हवाई क्षेत्रात गगन भरारी घेतलेल्या मॅब एव्हिएशनचे संस्थापक मंदार भारदे व महाराष्ट्राचा झेंडा जागतिक पातळीवर दिमाखाने उंचावणाऱ्या महिला बुद्धिबळ विश्वचषक विजेत्या दिव्या देशमुख यांना प्रदान करण्यात येणार आहे. या सोहळ्यास नांदेड शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजक संतोष पांडागळे, अभिजित देशमुख, बालाजी जाधव, संदीप पाटील, सीए मनोहर आयलाने, राजेश शिंदे यांनी केले आहे. .

# २४ लाखांचे सोने लंपास करणाऱ्या २ महिला जेरबंद

- भाग्यनगर पोलिसांची सीसीटीव्हीच्या आधारे कारवाई
- श्रीनगरमध्ये संशयास्पद होत्या हालचाली



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने चोरीच्या गुन्ह्याचा यशस्वी तपास करत २ चोर महिला आरोपींना अटक केली आहे. त्यांच्याकडून सुमारे २४ लाख रुपये किमतीचे १६० ग्रॅम सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.

सीसीटीव्ही आणि गोपनीय माहितीच्या आधारे उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने आणि पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील पोउपनि विनोद देशमुख, नरेश वाडेवाले आणि त्यांचे पथक पेट्रोलिंग करत असताना गोपनीय माहिती मिळाली की, श्रीनगर परिसरात काही संशयित महिला फिरत आहेत. तत्काळ कारवाई करत त्या महिलांना ताब्यात घेण्यात आले.

सीसीटीव्ही फुटेज, गोपनीय माहिती आणि सखोल चौकशीत त्या भाग्यनगर पोलीस ठाणे गु.र.नं. ०९/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) मधील संशयित असल्याचे निष्पन्न झाले. चौकशीत त्यांनी चोरीचा गुन्हा कबूल केला.

चौकशीत महिला आरोपींनी चोरी केलेले १६० ग्रॅम सोन्याचे दागिने त्यांच्याकडून जप्त करण्यात आले. बाजारभावानुसार या दागिन्यांची किंमत अंदाजे २४ लाख रुपये आहे.

# लोह्यात पतीने पत्नीस घातल्या गोळ्या; पत्नी गंभीर, पती फरार



**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा शहरातील उच्चभ्रूंची वसाहत असलेल्या शिक्षक कॉलनी भागात एका कुटुंबात पती-पत्नीत क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादाचे पर्यवसान चक्क बंदुकीतून गोळीबारात झाले. पतीने पत्नीवर झाडलेल्या गोळीबारात पत्नी गंभीर जखमी झाली असून, तिच्यावर नांदेड येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनास्थळास जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी भेट देऊन पाहणी केली.

लोहा शहरातील संत गाडगे महाराज विद्यालय व महाविद्यालयाच्या पाठीमागे असलेल्या उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या शिक्षक कॉलनी भागात जाधव कुटुंबीय मागील अनेक वर्षांपासून वास्तव्यास आहे. तिथे त्यांचे विद्यार्थी वसतिगृह आहे. त्याच्या बाजूस असलेल्या बिल्डिंगमध्ये त्यांचे कुटुंबीय वास्तव्यास आहे. तर प्रत्येक मुलांना वेगवेगळ्या खोल्या आहेत. कुटुंबीय जेवण आटोपून आपापल्या खोलीत झोपले असताना दैनंदिनप्रमाणे आरोपी विशाल सुरेश जाधव हा रात्री घरी आला. पत्नी अश्विनीने त्यास जेवणाचे ताट वाढून दिले. तेव्हा त्यांच्यात कुठल्यातरी कारणावरून बचाबाची होत असल्याचे परिसरातील रहिवाशांतून सांगण्यात आले. काही वेळाने पती विशाल जाधवने त्याच्या जवळ असलेल्या बंदुकीतून पत्नी अश्विनीवर गोळ्या झाडल्या. तेव्हा पत्नीने बहुतेक गोळी चुकविण्याचा प्रयत्न केला असावा असे बाजूच्या दरवाजावर लागलेल्या गोळ्याच्या खुणेवरून दिसून आले. सदरील घटना रात्री अकरा ते साडेअकरा वाजताच्या सुमारास घडली असल्याचे समजते. गोळीचा आवाज ऐकून बाजूच्या खोलीत असलेले विशालचे वडील सुरेश जाधव व इतर कुटुंबीय धावत आले. तेंव्हा आरोपी घटनास्थळावरून निघून गेला. जाधव कुटुंबियांनी विशालच्या गंभीर जखमी पत्नीस तत्काळ उपचारासाठी दवाखान्यात हलविले. सध्या त्यांच्यावर नांदेड येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# विद्यापीठात पीएच. डी. करणाऱ्या विद्यार्थ्याची आत्महत्या



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. विद्यापीठाच्या भाषा संकुल परिसरातील झाडाला गळफास घेऊन सोशल वर्क विषयात पीएचडी करणारा विद्यार्थी राहुल सोनाळे यांनी आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली. गस्तीवर असलेल्या सुरक्षा रक्षकाच्या निदर्शनास हा प्रकार आला.

राहुल सोनाळे हा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात सोशलवर्क विषयात पीएच.डी.चा संशोधक विद्यार्थी होता. त्याच्या निधनामुळे विद्यापीठ परिसरासह शहरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांनी हे टोकाचे पाऊल कोणत्या कारणामुळे उचलले, याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून तपास सुरू केला असून, आत्महत्येमागील कारणाचा शोध घेतला जात आहे.

# साडे बावीस लाखांचा पानमसाला आणि वाहन जप्त

## दोघांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रतिबंधित गुटखा आणि सुगंधित पान मसाल्याच्या अवैध वाहतुकीविरोधात मरखेल पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. थार वाहनातून वाहतूक होणारा बंदी असलेला गुटखा आणि वाहन असा २२ लाख ६० हजार ५६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून २ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

मरखेल पोलीस ठाण्याच्या हद्दीत दि. ६ जुलै रोजी मरखेल पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक रवी हुंडेकर यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून सापळा लावला. या सापळ्यात महिंद्रा थार क्रमांक (MH-38-K-0088) अडकली. या वाहनातून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व सुगंधित पान मसाला काळ्या बाजारात विक्रीसाठी नेला जात होता.

या माहितीच्या आधारे पंचांसमक्ष हणेगाव-तुंबरपल्ली रोडवरील पाण्याच्या टाकीजवळ रात्री सुमारे ११.३० वाजता ही कारवाई केली. या कारवाईत विविध ब्रँडचा



प्रतिबंधित गुटखा व पान मसाला, महिंद्रा थार वाहन आणि २ मोबाईल फोन असा एकूण २२ लाख ६० हजार ५६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी अक्षय गुरुदत्त इंदोरिया, वय ३३, रा. कपडा गल्ली, हिंगोली आणि दीपक लक्ष्मण शर्मा, वय २७ वर्षे, रा. मंगळवारा, हिंगोली यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याविरुद्ध मरखेल पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १२३, २७४, २७५, २२३, ३(५) तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियमातील कलम २३, २६(२), २७, ३०(२)(अ) व ५९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# काँग्रेसचे नेते एस. एस. बावजीर यांचे निधन



**नांदेड(प्रतिनिधी)–** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा बिलोली येथील आयडियल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष शेख सालम बावझीर सहाब (एस. एस. बावजीर) यांचे मंगळवार, दि. ७ जुलै रोजी निधन झाले. ते ६५ वर्षाचे होते. त्यांच्या पार्थिवावर बुधवार, दि. ८ जुलै रोजी सकाळी १० वाजता किल्ला रोड नांदेड येथे अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे.

# 'प्रेगा गॅबलीन'च्या ११० गोळ्या विक्रीसाठी नेताना ४ जण अटकेत

## अंमली पदार्थविरोधी मोहिमेत प्रतिबंधित कॅप्सुल आणि वाहतुकीसाठी वापरलेली गाडीही जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अंमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेत नांदेड ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. प्रतिबंधित 'प्रेगा गॅबलीन' कॅप्सुलची वाहतूक करणाऱ्या ४ जणांना ताब्यात घेऊन १२ लाख २ हजार ७१७ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अशा प्रकारचा गोरखधंदा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकार चिंचोलकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या हद्दीत गस्त घालत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून कारवाई केली. यावेळी चार जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून प्रेगा गॅबलीन कॅप्सुलचर ११ पॉकेट,



प्रत्येक पॉकेटमध्ये १० गोळ्या अशा एकूण ११० गोळ्या जप्त केल्या. या गोळ्यांची किंमत २७१७ असल्याचे सांगण्यात आले.

यासोबतच पोलिसांनी बारा लाख रुपये किमतीची पांढऱ्या रंगाची कार क्रमांक (MH-26 CH-3876) असा एकूण १२ लाख २ हजार ७१७ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

यावेळी पोलिसांनी रजनेश उत्तम खंदारे (वय ३८ वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. कर्मवीरनगर, नांदेड), अदित गणेश गिरी (वय २३ वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर, रा. कुरुळा, ता. कंधार, जि. नांदेड), बुद्धभूषण गणेश हटकर (वय २९ वर्षे, व्यवसाय हमाली, रा. विश्वनाथनगर, हनुमानगड, नांदेड) आणि दिगांबर गणेश कपाळे (वय २१ वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. मुक्तेश्वरनगर, वसरणी, नांदेड) यांना अटक करण्यात आली. आरोपींकडून प्रतिबंधित गोळ्यांच्या पुरवठा साखळीचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

# सहकारी शिक्षण पतपेढीतील नियमबाह्य नोकरभरती व आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी विभागीय सहनिबंधकांचे चौकशीचे आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषदेच्या शिक्षक सहकारी पतपेढीतील नियमबाह्य कामांची चौकशी करण्याचे आदेश विभागीय सहनिबंधकांनी दिले आहेत. पतपेढीतील नियमबाह्य नोकर भरती व गैरव्यवहाराची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. पतपेढी संचालकांनी तक्रार दाखल केल्यानंतर विभागीय सहनिबंधकानी ही कारवाई केली आहे.

मराठवाड्यातील सर्वात जास्त सभासद असलेली सहकारी शिक्षण पतपेढी ही जिल्ह्यातील शिक्षकांची आर्थिक संजीवनी म्हणून ओळखली जाते. मागील पंचवार्षिक योजनेमध्ये मागील सत्ताधारी संचालक मंडळांनी सभासदांचा विश्वास संपादन करत मोठ्या प्रमाणात भांडवल वाढवले व पतसंस्था संगणकीकृत केल्यामुळे नोकर भरतीला फाटा दिला.

निवडणुकीनंतर सत्ता बदल घडवून आले. या नवीन सत्ताधारी संचालक मंडळाने बहुमताच्या जोरावर मागील काळात रिक्त असलेली तीन पदे आवश्यक नसताना नियमबाह्य पद्धतीने नोकर भरती करून पतसंस्थेचे आर्थिक नुकसान केले. या विरोधात विद्यमान संचालक प्रल्हाद राठोड, संजय कोठाळे, संतोष आंबुलगेकर तर सभासद बालाजी बामणे, दत्तप्रसाद पांडागळे, व्यंकट गंदपवाड, शिवशंकर बोडके यांनी विभागीय सहनिबंधक लातूर यांच्याकडे महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम ७८ प्रमाणे संचालक मंडळ मंडळ बरखास्त करून प्रशासक नेमणे व कलम ८१व ८८ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत ॲड. एस. जी. सुगरे यांच्यामार्फत पुनरीक्षण अर्ज २५ ऑगस्ट २०२५ रोजी दाखल केला होता.

या प्रकरणी जिल्हा उपनिबंधक नांदेड यांनी १३ मे २०२६ रोजी सहाय्यक निबंधक एस. जी. गल्लेवार यांना चौकशी अधिकारी नेमून चौकशी करण्यासंदर्भात आदेश दिले.

# पंजाबच्या हेरॉईन तस्करी प्रकरणातील फरार आरोपीला नांदेडमधून अटक; नांदेड-पंजाब पोलिसांची संयुक्त कारवाई

## गुरुद्वारा परिसरात संशयास्पद हालचालींवरून अडकला पंजाबचा ड्रग तस्कर

**नांदेड (प्रतिनिधी)–** पंजाब राज्यातील अंमली पदार्थ तस्करीच्या गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपीला नांदेड पोलिसांच्या मदतीने पंजाब पोलिसांनी गुरुद्वारा परिसरातून ताब्यात घेतले आहे. नांदेड जिल्हा पोलीस आणि पंजाब पोलिसांच्या समन्वयातून ही कारवाई करण्यात आली.

शनिवार, दि. ४ जुलै रोजी गुरुद्वारा परिसरात संशयितरित्या वावरणाऱ्या एका व्यक्तीची स्थानिक गुन्हे शाखेने चौकशी केली. त्याने आपले नाव जुगराज सिंग उर्फ गोलू किक्करसिंग ढिल्लो (वय २४ वर्षे, रा. लहिया, पो. स्टे. सराई अमानत खान, जिल्हा तरनतारण, पंजाब) असे सांगितले.



सखोल पडताळणीत सदर युवक हा पंजाब राज्यातील NTF (Anti Narcotics Task Force), अमृतसर येथील गु.र.नं. ९८/२०२६ मधील हेरॉईन तस्करी प्रकरणातील पाहिजे असलेला आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार त्याला तत्काळ अटक करण्यात आली.

आरोपीस पंजाबला घेऊन जाण्यासाठीची आवश्यक न्यायालयीन प्रक्रिया पंजाब पोलिसांनी पूर्ण केली. संबंधित न्यायालयाने ट्रान्झिट रिमांड मंजूर केल्यानंतर आरोपीस पुढील तपासासाठी पंजाबमधील संबंधित तपास यंत्रणेच्या ताब्यात देऊन रवाना करण्यात आले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com